किंमत रु. ३०
पृष्ठे ४४

# जीवन शिक्षण

ऑक्टोबर २०२०

## वाचन प्रेरणा दिन



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र


जान्हवी
Thank You!
2020.09.08 17:11

# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

वर्ष ६४ | ऑक्टोबर २०२० | अंक ७ वा

❖ **प्रवर्तक :**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

❖ **प्रकाशक :**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.



❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

**दिनकर पाटील**, *संचालक तथा संपादक* — **अध्यक्ष**

**विकास गरड**, *प्र. प्राचार्य, आय.टी. व प्रसार माध्यम* — **सदस्य**

**डॉ. कमलादेवी आवटे**, *प्राचार्य, समता विभाग* — **सदस्य**

**डॉ. शोभा खंदारे**, *प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे.* — **सदस्य**

**अश्विनी मुसळे-काळसर्पे** *सहा. संचालक, लेखा* — **सदस्य**

**दत्तात्रय थिटे**, *वरिष्ठ अधिव्याख्याता,* — **सदस्य**
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.

**वर्षाराणी भोपळे**, *वरिष्ठ अधिव्याख्याता* — **सदस्य**
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.

❖ **डॉ. किरण धांडे**, *वरिष्ठ अधिव्याख्याता,* — **सदस्य-सचिव**
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.

❖ **निर्मिती सहायक :**
**अनुराधा चव्हाण**, *विषय सहायक, प्रसार माध्यम*
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.



❖ **मुद्रक : रुना ग्राफिक्स,** सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ **प्रती :** –

❖ **मूल्य : रु. ३०/-  वार्षिक वर्गणी रु. ३००/-**


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | – | ४ |
| ❖ बहुविध दृष्टिकोन निर्माण करणाऱ्या शिक्षणाची गरज | मा. अपर मुख्य सचिव यांची मुलाखत : डॉ. किरण धांडे | ५ |
| ❖ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा कोल्हापुरातील शालेय विद्यार्थ्यांशी सुसंवाद | दिनकर पाटील | ९ |
| ❖ गांधीजी : अहिंसक क्रांतीची तालीम देणारे शिक्षणशास्त्री | सुषमा शर्मा | १२ |
| ❖ अहिंसक समाजाच्या मुक्ततेसाठी नई तालीम | प्रा. प्रभाकर पुसदकर | १७ |
| ❖ लाल बहादूर शास्त्री | डॉ. विशाल तायडे | २० |
| ❖ वाचन : एक ऊर्जा स्रोत | डॉ. यशवंत पाटणे | २४ |
| ❖ वाचन संवाद | राजीव तांबे | २८ |
| ❖ वाचन संस्कृतीचा विकास : काळाची गरज | गो. रा. तायडे | ३० |
| ❖ वाचन संस्कृतीचा प्रसार | शशिकांत शिंदे | ३२ |
| ❖ वाचू आनंदे | डॉ. नीतू गावंडे | ३४ |
| ❖ वाचन वसा | नंदा कुलकर्णी | ३६ |
| ❖ नवोपक्रमशील शिक्षक व अधिकाऱ्यांसाठी एक व्यासपीठ | डॉ. गीतांजली बोरुडे | ३७ |
| ❖ वेळ व प्राथमिकता व्यवस्थापन | राजीव नंदकर | ३९ |
| ❖ प्रिय संपादक | | ४२ |



**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२  **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in



***या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.***

# संपादकीय ....



शिक्षक मित्रांनो,

ऑक्टोबर महिना हा महनीय व्यक्तींच्या जन्मदिवसाचा महिना आहे. महात्मा गांधी, लाल बहादूर शास्त्री आणि डॉ. अब्दुल कलाम या त्या महनीय व्यक्ती होत. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळातील या व्यक्तींचे देशासाठीचे योगदान आपण कधीच विसरू शकणार नाही. त्यांनी आपल्या आयुष्यात साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचा अवलंब केला. 'पृथ्वी प्रत्येकाच्या गरजा भागविण्याइतकी समर्थ आहे, पण प्रत्येकाची हाव भागविण्याइतकी समर्थ नाही' हा विचार महात्मा गांधीजींनी दिला आणि स्वत: तो आचरणात आणला. शास्त्रीजींची विचारसरणी आणि साधी राहणी आपल्या सर्वांनाच भावली आहे आणि डॉ. अब्दुल कलाम यांचे विचार आणि राहणीमान आपणां सर्वांना प्रत्यक्ष पाहता आले आहेत. गांधीजी आणि शास्त्रीजी यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन देशाला स्वातंत्र्य मिळवून देऊन स्वतंत्र, उज्ज्वल भारताचे स्वप्न पाहिले होते, तर डॉ. कलाम यांनी सन २०२० सालच्या विकसित भारताचे स्वप्न पाहिले. या सर्वांचे स्मरण करणे आणि त्यांच्या विचारांचा अवलंब करणे आपले कर्तव्य आहे.

१५ ऑक्टोबर हा माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. वाचनाचा संस्कार शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांवर करणे हा त्यामागील हेतू आहे. जगातील सर्व क्षेत्रांतील मोठ्या व्यक्तींचे मोठे होण्यामागचे अत्यंत महत्त्वाचे कारण त्यांचे वाचन हे आहे. जॉन रस्कीन यांच्या 'unto this last' या पुस्तकाच्या वाचनाने गांधीजींच्या जीवनामध्ये आमूलाग्र बदल झाला. डॉ. कलाम यांचे वाचनही खूप होते. ते म्हणत, ''मोठी व्यक्ती भेटली तर, त्यांनी कोणती पुस्तके वाचली आहेत हे विचारून घ्या.'' कोल्हापूर येथे शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी मला लिलीयन इचलेर वॉटसन यांचे 'Light from many lamps' हे पुस्तक वाचण्यास सुचविले; मी ते वाचले. आपणही सर्वांनी ते वाचावे अशी माझी विनंती आहे. या प्रेरणा दिनी वाचन चळवळ वाढवू या, नवी पिढी सक्षम बनवू या!

वरील सर्व महनीय व्यक्तींचे स्मरण करून आपणा सर्वांना वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छा!



**दिनकर पाटील**
संपादक, जीवन शिक्षण

# बहुविध दृष्टिकोन निर्माण करणाऱ्या शिक्षणाची गरज

**डॉ. किरण धांडे**
वरिष्ठ अधिव्याख्याता,
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.

**मुलाखत :** वन्दना कृष्णा
अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या अपर मुख्य सचिव, वन्दना कृष्णा यांची, राज्याच्या शैक्षणिक परिस्थितीविषयी असलेली मते, भविष्यासाठीचा दृष्टिकोन आणि योजना जाणून घेण्यात आल्या. राज्यापुढे सध्या शिक्षणाची कोणती आव्हाने आहेत? काय मार्ग आहेत गुणवत्ता उंचावण्याचे? यांसारख्या अनेक प्रश्नांना त्यांनी अत्यंत मुक्तपणे उत्तरे दिली आहेत. त्यांच्याशी डॉ. किरण धांडे यांनी साधलेला संवाद खास 'जीवन शिक्षण'च्या वाचकांसाठी.



**प्रश्न : सध्याच्या शालेय शिक्षणापुढे कोणकोणती आव्हाने आहेत?**

**उत्तर :** शालेय शिक्षण विभागापुढे अनेक आव्हाने आहेत. त्या आव्हानांचा विचार करता प्राधान्यक्रमाने राज्यातील शालेय शिक्षण विभागांतर्गत शिकणाऱ्या शंभर टक्के विद्यार्थ्यांना पायाभूत भाषिक व गणितीय साक्षरता प्राप्त करून देणे गरजेचे आहे. पाचवीच्या विद्यार्थ्यांना वाचता येत नाही. मूलभूत गणित करता येत नाही. विविध सर्वेक्षण अहवालातून स्पष्ट झालेली ही बाब खूप निराशाजनक आहे. प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळायला हवे. शिक्षण हक्क कायद्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी दिली आहे. शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलाला भाषिक साक्षरता प्राप्त करून देणे, त्याचबरोबर मूलभूत गणितीय क्षमता प्राप्त करून देणे, यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी शासन पावले उचलत आहे. हे आव्हान पेलण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. सध्या कोरोनाच्या काळात शाळा बंद आहेत. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने मुलांना शिक्षणाशी जोडून ठेवण्याच्या दृष्टीने व त्यांचे शिक्षण सुरू रहावे यासाठी प्रयत्न होत आहेत. स्थानिक पातळीवर प्रशासनाच्या वतीने आणखीही काही प्रयत्न केले जात आहेत, ही गोष्ट सकारात्मक असली, तरी देखील कम्युनिटी क्लासेस सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे लागणार आहेत. ते आव्हान येणाऱ्या काळात पेलावे लागणार आहे. सुविधांपासून वंचित असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रवास सुरू ठेवावा लागणार आहे. कोरोनाच्या काळात देखील प्रत्येक मूल शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी पावले उचलली जात आहेत, पण सध्याच्या परिस्थितीमध्ये प्रत्येक मुलापर्यंत शिक्षण पोहोचविणे हे एक आव्हानच आहे.

**प्रश्न : ग्रामविकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, महिला व बालकल्याण आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभाग या विविध व्यवस्थापनाच्या शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी काय प्रयत्न सुरू आहेत?**

**उत्तर :** राज्यात सध्या शालेय शिक्षण विभाग, समाज कल्याण विभाग, आदिवासी विभाग, विविध स्थानिक

स्वराज्य संस्था, कॅन्टोन्मेंट बोर्ड यांच्या शाळा आहेत. या सर्व शाळा त्या त्या विभागांतर्गत चालविल्या जातात. त्या त्या विभागातील शिक्षकांची नियुक्ती ते ते विभाग करतात. त्यांच्यावर त्या त्या विभागाचे प्रशासकीय नियंत्रण असते. त्यामुळे एकूण सर्व शाळा आणि त्यांच्यावरील सनियंत्रण हे वेगवेगळ्या विभागाचे असल्याने एकत्रितरीत्या शिक्षणाच्या गुणवत्तेचा विचार करता येत नाही. खरे तर या प्रत्येक विभागातील शिक्षकांचे स्वतंत्र कॅडर आहे. शिक्षकांचे सर्व कॅडर एकत्रित करण्याची गरज आहे. त्यांच्या बदल्या विभाग बदलून होण्याची गरज आहे. असे झाल्यास सर्वच विभागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीस लागेल असे मला वाटते.

**प्रश्न : शिक्षक प्रशिक्षणासंदर्भात आपले मत काय आहे?**

**उत्तर :** शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर राष्ट्राचे भविष्य अवलंबून असते. त्या माध्यमातून उत्तम नागरिक निर्माण होत असतो. त्यामुळे शिक्षणातून गुणवत्तापूर्ण विद्यार्थी निर्माण करण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांमध्ये अधिक चिकित्सक, विचार प्रवर्तक दृष्टी आणि सर्जनशीलता विकसित करावी लागेल. त्यासाठी शाळा व शिक्षकांनी अधिक सक्षम होण्याची गरज आहे. त्यासाठी सेवापूर्व व सेवांतर्गत प्रभावी प्रशिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे. शाळेत शिकवीत असलेला प्रत्येक शिक्षक प्रशिक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे कारण आता शिक्षकांना भविष्यासाठी तयार राहावे लागणार आहे. एकविसाव्या शतकाची आव्हाने आपल्याला पेलावी लागणार आहेत. येणाऱ्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडून शिक्षकांच्या प्रशिक्षणांचा विचार करावा लागणार आहे. अल्पकालीन, दीर्घकालीन प्रशिक्षणे ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून दिली जाणार आहेत. त्यातून निरंतर शिक्षणाची प्रक्रिया सुरू राहणार आहे. स्वतः शिकत राहणे महत्त्वाचे आहे. प्रशिक्षण अभ्यासक्रम घरी बसून करता येणार आहे. यातूनच वर्गातील आंतरक्रिया अधिक गतिमान होऊन प्रशिक्षणांचा गुणवत्तेवर सकारात्मक परिणाम होणे शक्य होणार आहे. प्रशिक्षणातून शिक्षक जितके सक्षम होतील तितकी शिक्षणाची गुणवत्ता उंचावणार आहे. त्यामुळे नव्या युगाचा आवाज ऐकून आपल्याला पावले टाकावी लागणार आहेत. भविष्यासाठी शासन त्या दृष्टीने पावले उचलणार आहे.

**प्रश्न : शिक्षण विभागातील रिक्त पदांची संख्या मोठी आहे; त्याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होतो का?**

**उत्तर :** शिक्षण विभागात रिक्त पदे आहेत, ज्याचा सरळ परिणाम काही प्रमाणात शैक्षणिक गुणवत्तेवर निश्चितच होतो, पण गुणवत्तेवर इतरही घटक परिणाम करीत असतात. पर्यवेक्षकीय अधिकारी कमी असले तरी स्थानिक पातळीवरील केंद्रप्रमुख, साधन व्यक्ती, शिक्षण विस्तार अधिकारी पदे आहेत. अर्थात जेथे संपूर्ण प्रशासकीय जागा भरलेल्या आहेत, तेथील गुणवत्ता आणि जेथे पदे रिक्त आहेत तेथील शैक्षणिक गुणवत्ता यांच्यात फार मोठा फरक आहे असे दिसत नाही. धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर रिक्त जागांचा नक्कीच परिणाम होताना आढळून येतो. माझ्या मते सर्वाधिक शैक्षणिक गुणवत्ता ही शिक्षकांची कल्पकता आणि त्यांनी घेतलेले कष्ट यांवरच अवलंबून असते. आपण चाकोरी बाहेर जाऊन किती प्रमाणात प्रयोगशीलता जोपासतो हे महत्त्वाचे आहे. समाजात जे उच्चशिक्षित आहेत त्यांनी शाळेमध्ये एखाद्या विषयासाठी विशेष योगदान द्यावे. समाजातील विशेष नागरिकांचा सहभाग शिक्षणामध्ये घेणे महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने शाळा व्यवस्थापन समिती आणि समाजातील दानशूर



१ ऑक्टोबर : मेट्रिक दशमान पद्धती आरंभ (१९५८)

व्यक्ती यांच्या मदतीने चाकोरी बाहेरचे प्रयोग करावे लागणार आहेत. अशा प्रकारे गुणवत्ता वाढविण्यासाठी वेगळी पावले टाकण्याचा प्रयत्न राज्यात काही शाळांनी केला आहे त्याचा परिणाम चांगला दिसत आहे. त्याच बरोबर शिक्षकांच्या मूल्यमापनात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद नोंदविण्याची गरज आहे. सध्या असे आपण करीत नाही, पण येत्या काळात करण्याची गरज आहे. त्या संदर्भात नवीन शैक्षणिक धोरणात देखील नमूद केले आहे.

**प्रश्न : आपण यापूर्वी अनेक विभागांत काम केले आहे, ते विभाग आणि शिक्षण विभाग यांमध्ये काय फरक जाणवतो?**

**उत्तर :** आपल्या विभागात असणारी पदांची संख्या निश्चित नाही. विद्यार्थी जसे कमी अधिक होतात त्या प्रमाणे आपल्याकडे शिक्षकांची संख्या सुद्धा कमी अधिक होत असते. पदे किती आहेत आणि किती गरज आहे हे निश्चित सांगता येत नाही. पदे वाढली तर स्वीकारले जातात, पण पदे कमी झाली तर ते स्वीकारले जात नाही ही अडचण आहे. शिक्षण विभाग हा प्रत्यक्ष मानवी जीवनाशी संबंधित असणारा विभाग आहे. राष्ट्राचे भविष्य घडविणाऱ्या या विभागात काम करीत असताना तेवढ्याच संवेदनशीलतेने काम करणे गरजेचे आहे आणि विभागाचा आवाका मोठा असल्याने प्रश्न पण भरपूर आहेत.

**प्रश्न : क्षेत्रीय कार्यालये अधिक सक्षम करण्यासाठी काही योजना आहे का?**

**उत्तर :** शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी खरे तर क्षेत्रीय कार्यालयात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना वेळ मिळत नाही. त्यांचा प्रशासकीय कामात, इतर न्यायिक कामात अधिक वेळ जात असतो. वैयक्तिक मान्यतेसारख्या प्रकारात ते गुंतून पडतात. मग त्यातूनच केले तर कसे केले आणि नाही केले, तर का नाही केले यांसारख्या प्रकारात अधिक गुंतणे होत आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांना यांसारख्या कामातून मुक्त करावे लागेल..

**प्रश्न : राज्याचा शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा उंचावण्यासाठी काय योजना आहेत?**

**उत्तर :** शिक्षणाची प्रक्रिया पाठ्यपुस्तक केंद्रित आहे. त्या पुस्तकाच्या पलीकडे देखील खूप शैक्षणिक अनुभव घेता येतात व त्यातून शिकण्याची प्रक्रिया निरंतर सुरू राहू शकते. त्यामुळे चौकटीतील अध्ययन–अध्यापन प्रक्रियेच्या बाहेर जाऊन अध्ययन अनुभव देण्याची गरज आहे. एकविसाव्या शतकाची कौशल्ये प्राप्त करून देणे गरजेचे आहे. चिकित्सक विचार प्रक्रिया रुजविणे महत्त्वाचे आहे, त्याचबरोबर विश्लेषणात्मक दृष्टी निर्माण करणे देखील महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. विद्यार्थ्यांना विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी एक आणि एकच उत्तर दिले म्हणजे तेच बरोबर असते असे नाही. पुस्तकात देण्यात आलेल्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे तो एक दृष्टिकोन आहे, पण त्यासारखे अनेक दृष्टिकोन असतात. ते स्वीकारणे देखील महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांचा असा बहुविध दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. परीक्षेत देखील ज्या स्वरूपात प्रश्न विचारले जातात, त्यात बदल करावा लागणार आहे. मुलांना आव्हान मिळेल, स्वतंत्रपणे विचार करता येईल आणि त्या प्रश्नाचा शोध घेत त्याचे निरंतर शिक्षण सुरू राहील असे प्रयत्न करावे लागतील.

**प्रश्न : राज्याच्या अपर मुख्य सचिव म्हणून शिक्षकांकडून काय अपेक्षा आहेत?**

**उत्तर :** विद्यार्थ्यांनी अध्ययन निष्पत्ती साध्य करावी याकरिता शिक्षकांनी प्रयत्न करायला हवे. राज्यातील प्रत्येक मूल उत्तम रीतीने शिकते करण्यासाठी

त्यांनी उत्तरदायित्व स्वीकारायला हवे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. तो अधिकार त्यांना मिळवून देण्यासाठी शिक्षकांनी मदत करायला हवी. या राष्ट्रीय व राज्याच्या विविध सर्वेक्षणात गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रतिबिंब पडायला हवे. राज्यात विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी सुविधा हव्यातच, त्याचप्रमाणे शिक्षकांना देखील वातावरण मिळायला हवे. शाळा अधिक पटाची असेल, तर विद्यार्थ्यांचे गट पद्धतीने शिकणे प्रभावी होते. कमी पटाच्या शाळांचा पट वाढण्याची गरज आहे. पट कमी असेल, तर विद्यार्थ्यांच्या सामाजिकीकरणात अडचणी येतात. त्यामुळे शाळांचा पट वाढवून मुलांच्या शिक्षणासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले जावे. राज्याच्या शिक्षकांकडून गुणवत्ता वृद्धी अपेक्षित आहे. त्यांनी उत्तरदायित्व निभावले तर गुणवत्ता साधली जाईल यात शंका नाही.

**प्रश्न : शिक्षण विभागातील सुधारणेसाठी मुददे कोणते?**

**उत्तर :** सध्याच्या प्रचलित परीक्षा पद्धतीतील प्रश्नांनी एकविसाव्या शतकाची कौशल्ये प्राप्त करण्यात अडचणी आहेत. मुळात उद्दिष्टांचा विचार करून प्रश्नांची भाषा बदलायला हवी. परीक्षा मंडळाच्या परीक्षेतही बदल व्हायला हवेत. चिकित्सक, विश्लेषणात्मक स्वरूपाचे प्रश्न हवेत. यामुळे काही काळ बोर्डाचा निकाल घसरेल, पण तसा निकाल स्वीकारण्याची हिंमत दाखवावी लागेल. चांगले बदल घडवायचे असतील तर असे घडणारच ही मानसिकता निर्माण करावी लागेल. प्राथमिक स्तरावर रोज प्रकट वाचन आणि श्रुतलेखन सरावाची देखील गरज आहे. त्यातून विद्यार्थ्यांना लेखन, वाचन करता येईल, मात्र या कौशल्यांबरोबर आकलन तपासणे देखील महत्त्वाचे आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत गरजेप्रमाणे विचार करावा लागणार आहे. जसे : गणिताचा विचार करता मूलभूत गणित आणि उच्च गणित असे विषय ठेवता येतील का? विद्यार्थ्यांना भविष्यात कोणत्या वाटेने जायचे आहे त्यानुसार त्यांना विषय निवडण्याचे स्वातंत्र्य असायला हवे. त्याचबरोबर गुणवत्ता विकासासाठी पहिलीच्या वर्गापासून द्विभाषिक पद्धतीने शिकविण्याची गरज आहे. त्या दृष्टीने वर्गात आंतरक्रिया करण्याबरोबर विद्यार्थ्यांना दोन्ही भाषा वापरण्याचे स्वातंत्र्य दिले जायला हवे. त्यातून विद्यार्थी एकाच वेळी दोन्ही भाषेत संवाद साधतील. शेवटी मला एवढेच म्हणायचे आहे की, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता हे सांघिक काम आहे आपण सर्व मिळून गुणवत्ता प्राप्तीसाठी प्रयत्न करू या.

शिक्षणात गुणवत्ता साध्य करायची असेल तर काही महत्त्वाचे मुद्दे मी सुचवू इच्छिते. कमी पटाच्या शाळांमध्ये मुलांचे सुयोग्य सामाजिकीकरण होण्यात अडचणी येतात असे मला वाटते कारण समाज व्यवस्थेमध्ये जितकी विविधता असेल तितक्या विविधांगी अनुभवाने व्यक्ती समृद्ध होत असते व तिचे व्यक्तिमत्त्व सर्वांगाने विकसित होते. हीच बाब शाळेलाही लागू पडते. शाळा समाजाची लहान प्रतिकृती आहे. शाळेमध्ये जितके विद्यार्थी जास्त तितके शिक्षक जास्त. त्यांच्याकडून मिळणारे अध्ययन अनुभव पण विविध प्रकारचे असतात. त्यातून मुलांच्या आपापसातील आंतरक्रिया निरनिराळ्या पैलूंनी विकसित होत जातात. त्यामुळे कमी पटाच्या शाळांचे एकत्रीकरण करून मुलांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी हातभार लावायला हवा. यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांची भूमिका फार महत्त्वाची आहे. मुलांना दर्जेदार शिक्षण द्यायचे असेल तर अशा मोठ्या पटाच्या समृद्ध शाळांची निर्मिती करून, मनात कोणताही किंतु न ठेवता सर्वांनी मिळून प्रयत्न करायला हवेत.

■■■

# ‘युवकांचे सबलीकरण’
# डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा कोल्हापुरातील शालेय विद्यार्थ्यांशी सुसंवाद

**दिनकर पाटील**
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक
महाराष्ट्र राज्य.

२४ फेब्रुवारी, २०१० हा माझ्या जीवनातील अविस्मरणीय दिवस होता. या दिवशी डॉ. अब्दुल कलाम, भारताचे माजी राष्ट्रपती यांनी कोल्हापूर येथील ७०० शालेय विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. त्यावेळी मी कोल्हापूर येथे शिक्षण उपसंचालक होतो आणि या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन केले होते. कोल्हापूरच्या केशवराव भोसले नाट्यगृहामध्ये डॉ. अब्दुल कलाम यांनी जवळजवळ पाऊण तास विद्यार्थ्यांशी इंग्रजीमधून संवाद साधला. साधे, सोपे आणि समजेल असे इंग्रजी असू शकते हे त्यावेळी कळले. शेवटी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. विद्यार्थ्यांचे प्रश्न इतके होते की, सर्व प्रश्नांना उत्तरे देणे शक्य नव्हते म्हणून मी काही महत्त्वाचे प्रश्न ई-मेलद्वारे पाठविले. त्यांचीही उत्तरे तात्काळ मेलद्वारे प्राप्त झाली. विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि त्यांना दिलेली उत्तरे ही निश्चितच शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षण क्षेत्रातील सर्वच घटकांना उपयुक्त आहेत म्हणून या ठिकाणी देण्याचा प्रयत्न.



### मोबाईल फोनचे काय परिणाम आहेत?

प्रत्येक दोन भारतीयांमागे एक मोबाईल फोन आहे. मोबाईल हे संपर्काचे साधन आहे. ऊस पिकविणारा शेतकरी मोबाईलवरून ऊसाचा प्रति टन दर विचारू शकतो. जास्तीत जास्त पीक घेण्यासाठी कोणत्या प्रतीचे खत आवश्यक असते, याचीही तो माहिती घेऊ शकतो. अशा प्रकारे मोबाईलची मदत होते. मोबाईल आपला मित्र (सखा) आहे.

### चीन साम्यवादाद्वारे यश संपादन करतो आहे, त्यामागे भारताला लोकशाहीद्वारे यश प्राप्त करणे शक्य आहे का?

प्रिय बालकांनो, तुम्हीच या प्रश्नाचे उत्तर द्याल. मी तुम्हांला दोन पर्याय देतो. तुमच्याकडे लोकशाही असलेला, तसेच साम्यवाद असलेला समाज आहे. यांपैकी कोणता समाज तुम्ही निवडाल? लोकशाही हवी असेल तर हात वर करा. (सर्वांनी हात वर केले आहेत, हे पाहिल्यानंतर) आता तुम्हीच उत्तर बघा.

### संपूर्ण भारतभर समान पाठ्यक्रमाची अंमलबजावणी करणे शक्य आहे काय?

मला ते अधिक आवडेल. समान पाठ्यक्रम असल्यास शिक्षणाची गुणवत्ता वाढेल. आपल्या राष्ट्राची प्रगती कशी होत आहे. हे सुद्धा समजेल. एकच नव्हे, तर सर्व विभागांची प्रगती होईल. मी समान पाठ्यक्रमास प्राधान्य देईन.

**सर आपले परग्रहवासीयांबाबत काय मत आहे?**

आपणाकडे सौर मंडळ आहे. सूर्याभोवती आठ ग्रह फिरतात. काही वर्षांपूर्वी नऊ ग्रह होते परंतु त्यांपैकी एक लहान असल्याने तो गृहीत धरला जात नाही. या आठ ग्रहांपैकी आतापर्यंत फक्त एका ग्रहावर मनुष्य, प्राणी, माशा व अनेक गोष्टी आहेत. लक्षावधी आकाशगंगा आहेत आणि आपल्या आकाशगंगेत अब्जावधी तारे आहेत. प्रत्येक ताऱ्याचे पृथ्वीसारखे असंख्य ग्रह असतात. अशा ग्रहांवर उच्च प्रकारचे विकसित मनुष्य प्राणी, जीवन असणे शक्य आहे. माझे मत आहे की, फक्त आपल्याच सौर मंडळात जीवन हे वैशिष्ट्य नाही. मला वाटते की, आपल्या सौर मंडळात जीवन (Life) एकमेव नाही. हा प्रश्न चांगला आहे.

**कृपया नॅनो तंत्रज्ञानाविषयी स्पष्टीकरण द्याल काय व जवळच्या भविष्यात त्याची उपयोगिता काय असेल?**

नॅनो टेक्नॉलॉजी म्हणजे –

अब्जावधीतील 15 म्हणजेच $10^{-9}$

कोणत्याही पदार्थाचे आपण तुकडे करीत गेलो तर त्या पदार्थाच्या $10^{-9}$ कणाची वैशिष्ट्यपूर्ण गुणवत्ता असते. हे तंत्रज्ञान बायोटेक्नॉलॉजी व माहिती तंत्रज्ञान यांना जोडेल. या तिन्हींचा वापर करून तुम्हांस एक यंत्रमानव निर्माण करता येईल. हा यंत्रमानव तुम्ही शरीरात टोचू शकता. हा यंत्रमानव (डॉक्टर) रोगाचा शोध घेईल व त्यावर उपचार करेल कारण ही डी.एन.ए. वर आधारित गोष्ट आहे म्हणून नॅनो टेक्नॉलॉजी महत्त्वाचे क्षेत्र ठरणार आहे.

**सध्या आपण कोणते संशोधन करीत आहात?**

माझे तीन विद्यार्थी आहेत. (तू लहान मुलगी आहेस पण मोठा प्रश्न विचारतेस!) मी त्यांना पीएच.डी. साठी मार्गदर्शन करीत आहे. एकाचे नाव आहे जॉर्ज. तो मानसिकदृष्ट्या विकलांग बालकांचा अभ्यास करीत आहे. अशा मुलांच्या मेंदूत कोणता बिघाड (दोष) आहे. यावर तो संशोधन करीत आहे. माझा यात सहभाग आहे. ग्रामीण भारताला नागरी (शहरी) सुविधा देण्याबाबतच्या दुसऱ्या संशोधनात मी गुंतलो आहे. अनेक प्रकारच्या तंत्रज्ञानाची त्यासाठी गरज आहे व मी त्यावर कार्य करीत आहे.

**क्लोनिंग तंत्रज्ञानाचा वापर करून बुद्धिमान माणूस निर्माण करणे शक्य आहे का?**

मी वैयक्तिकपणे विश्वास ठेवतो की, तुम्ही आणि मी, आपणा सर्वांना ईश्वराने अब्जावधी वर्षे जिनेटिक इंजिनिअरिंगचा वापर करून निर्माण केले आहे. ईश्वर हा एक अभियंता आहे. आपल्यापैकी प्रत्येकाच्या मेंदूस अब्जावधी वर्षांचा अनुभव मिळालेला आहे. कोणतेही क्लोनिंग एका बुद्धिमान माणसाची पुनरावृत्ती करू शकत नाही परंतु क्लोनिंगद्वारे मानवी अवयव निर्माण केले जाऊ शकतात. डोळे, नाक, कान, यकृत इ. अवयव क्लोनिंगद्वारे निर्माण केले जाऊ शकतात. मनुष्यप्राण्यांच्या क्लोनिंग विरोधात मी आहे.

**कृपया आपल्या जीवनातील एखादा अविस्मरणीय प्रसंग सांगा?**

माझ्या जीवनावर तीन व्यक्तींनी प्रभाव पाडलेला आहे :

१. प्रा. विक्रम साराभाई ज्यांनी मला माझ्या जीवनाचे ध्येय दिले. ७ वर्षे मी त्यांच्या शाळेत काम केले आहे.
२. प्रा. सतीश धवन, ज्यांनी भारतातील पहिला एस. एल. व्ही. प्रकल्प (Sattelite Launch Vehicle) यंत्रणा मजवर सोपविली.
३. डॉ. ब्रम्ह प्रकाश हे थोर अणुवैज्ञानिक व महान व्यक्ती होते.

वरील तीन थोर व्यक्तींनी मला प्रभावित केले आहे.

**आपल्या संशोधन कार्यापैकी सर्वांत महत्त्वाचे संशोधन कोणते?**

माझ्या कार्यगटाने १९८० मध्ये उपग्रह प्रक्षेपण वाहक (SD) तयार केला. आम्ही अवकाशात उपग्रह सोडला. याचा मला अतिशय आनंद झाला. १९८९ मध्ये २००० कि.मी. पर्यंत लक्ष्य भेदणारा अग्निबाण तयार केला. त्याचाही मला आनंद वाटला. नंतर सन १९९८ मध्ये उन्हाळ्यात राजस्थानमध्ये ५०° तापमान असताना



२ ऑक्टोबर : महाराष्ट्रात मुंबई येथे दूरदर्शन प्रक्षेपणास सुरुवात (१९७२)

भारत अण्वस्त्रे असणारा देश बनला. याचा सुद्धा आम्हा सर्वांना खूप आनंद होतो. चौथा क्षण मला अत्यानंद देतो. अग्निबाण बनविण्यासाठी वापर केल्या जाणाऱ्या पदार्थांचा उपयोग पोलिओग्रस्त मुलांच्या कॅलिपर्सचे वजन कमी करण्यासाठी करण्यात आला. ४ कि.ग्रॅ. वजन असणाऱ्या कॅलिपर्सचे वजन ४०० ग्रॅम पर्यंत कमी करण्यात आले व पोलिओग्रस्त मुले पळू लागली. त्यांच्या मातांच्या डोळ्यांत अश्रू आले. हा अत्यंत आनंदाचा क्षण होता.



**राष्ट्रीय छात्र सेनेचा छात्र म्हणून देशातील बाल-कामगारांचे प्रमाण कमी करण्यासाठी मी काय करू शकतो?**

माझ्या माहितीप्रमाणे बालकामगारांविरोधी कायदा आहे परंतु जर अशी मुले आपणास आढळली तर हा कायदा अत्यंत प्रभावी ठरेल. अशा मुलांना शिक्षण देण्याची सुविधा व त्यांच्यासाठी रोजगाराची सुद्धा संधी निर्माण करावी लागेल. तरुण मुलगा म्हणून तुझी चांगली आर्थिक क्षमता असेल तर अशा मुलांना शिक्षण दे.

संचालक, दिनकर पाटील, तत्कालीन उपसंचालक म्हणून यांनी महामहीम राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना विचारलेले पाच प्रश्न व मा. राष्ट्रपती यांचेद्वारा प्राप्त उत्तरे :

**प्रश्न १ : आपल्याला ज्ञान देणारे शिक्षण आणि उपजीविकेसाठी मदत करणारे शिक्षण यांपैकी आदर्श शिक्षण कोणते?**

**उत्तर :** ज्ञान हा शिक्षणाचा अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे. ज्ञानाचा उपयोग हुशारीने उदरनिर्वाहासाठी केला जाऊ शकतो. यापेक्षाही शिक्षणाचा अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे युवकांचे सबलीकरण करणे, ज्याद्वारे त्यांना चांगले व वाईट आणि चूक की बरोबर यांतील भेद जाणता येईल.

**प्रश्न २ : आपण माझे शिक्षक आहात आणि जर मी माझा गृहपाठ केलेला नसेल तर आपण मला कोणत्या प्रकारची शिक्षा द्याल?**

**उत्तर :** मी तुझ्याबरोबर बसून तुझा गृहपाठ करून घेईन.

**प्रश्न ३ : राष्ट्रपती आणि वैज्ञानिक या दोन भूमिकांमधील समतोल आपण कसा साधता?**

**उत्तर :** वैज्ञानिक म्हणून मी देशासाठी ५०० तज्ज्ञांच्या मदतीने दृष्टिक्षेप २०२० (व्हिजन २०२०) विकसित केले आहे. राष्ट्रपती म्हणून मी या दृष्टिक्षेपाचे देशातील सर्व भागधारकांकरिता विपणन (मार्केटिंग) करू शकतो.

**प्रश्न ४ : शेतीआधारित अर्थव्यवस्था सुधारण्याकरिता काय करायला हवे असे आपणांस वाटते?**


**उत्तर :** शेती हा प्रतिष्ठित व्यवसाय बनणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी शिक्षक, नियोजक, संशोधक आणि उद्योग व्यावसायिक या सगळ्यांनी मिळून त्यांच्या बरोबर काम करायला हवे. खेडेगावामध्ये एक प्रकल्प म्हणून शेती विकासासाठी योगदान देणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षण व्यवस्थेने क्रेडीट द्यायला हवे.

**प्रश्न ५ : अपयश आल्याने आत्महत्या करणाऱ्या युवकांना आपण काय सल्ला द्याल?**

**उत्तर :** युवकांनी 'मी करू शकतो, आपण करू शकतो आणि राष्ट्र करू शकते असा आत्मविश्वास स्वतःमध्ये विकसित करावा.' एकदा हा आत्मविश्वास रुजविला गेला की, विद्यार्थ्यांना अपयशाचे भय वाटणार नाही. त्यांना तो टिकवून ठेवण्यासाठी व यशस्वी होण्यासाठी बळ देईल. सर्व शाळांमध्ये हेच प्रत्येक विद्यार्थ्याला शिकविण्याची गरज आहे.

# गांधीजी : अहिंसक क्रांतीची तालीम देणारे शिक्षणशास्त्री

**सुषमा शर्मा**
आनंद निकेतन, नई तालीम समिती, सेवाग्राम
भ्रमणध्वनी : ९८८१०१८१८८



निसर्गाला आव्हान देत मानवाने पृथ्वीवर आपण बुद्धी सामर्थ्याने राज्य करू शकतो असा अभिमान बाळगला. मात्र विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने माणूस अधिकाधिक सुखी होईल अशी कल्पना बाळगून त्याने जे काही प्रयत्न केले, त्यातून आज दिसणाऱ्या भव्य-दिव्य इमारती, चकाकणारे रस्ते, स्वत:ला सजविता येणारी, भुलविता येणारी सर्व प्रकारची साधने, वेगवान व अति वेगवान मोटारगाड्या, ट्रेन्स आणि विमाने, बटणाच्या अंतरावर जगाच्या कानाकोपऱ्यात संदेश नेता येणारी डिजिटल तंत्रे, सुखकारी वातानुकूलित यंत्रणा हेही सारे काही आकाराला आले. यालाच विकास असे म्हटले जाऊ लागले. साहजिकच ही सुखे मिळविण्यासाठी श्रीमंतांची, मध्यम वर्गाची आणि त्यांच्या पाठीमागे गरिबांचीही दौड सुरू झाली.

*महात्मा गांधीजींच्या 'नई तालीम' शिक्षण प्रणालीची वैशिष्ट्ये, त्यातील मूलभूत तत्त्वांची आजच्या काळातील गरज आणि काळानुसार त्यात बदल करून पुनर्स्थापित केलेल्या आनंद निकेतन या विद्यालयाविषयी...*

विकासाच्या या नादात निसर्गाच्या विरुद्ध जाण्याचे भीषण परिणाम लक्षात घेतले नाहीत; ते आज आपल्याला दिसत आहेत. तापमान वाढ, अमेझॉन-कॅलिफोर्निया येथील जंगलांना लागलेल्या भीषण आगी, यातून माणूसच नव्हे तर जीवसृष्टीचा झालेला भीषण संहार आपण पाहत आहोत. पावसाचा लहरीपणा वाढत गेल्याने पूर व दुष्काळाची वारंवारिता वाढतच जाणार आहे. तीच बाब वादळांबाबतही आहे. कोरोनापूर्वी व कोरोनानंतरही विविध सूक्ष्मजंतूंचे आघात मानवी जीवनावर पुन्हा पुन्हा होत आलेले आहेत आणि पुढेही राहणार आहेत. निसर्गाशी पंगा घेऊन आपण अमर्याद विकास साधू शकतो हेच जर आपल्या विकासाचे प्रारूप असेल, तर आपल्या पुढील पिढ्यांसाठी अतिशय बिकट परिस्थिती निर्माण होईल म्हणून तंत्रज्ञान मानवी हिताचे असावे आणि त्याचा विकास व अवलंब कसा करावा यावर समाजाचे नियंत्रण असावे, स्व-कल्याणासाठी लोकांना त्याला गरजेनुरूप आकार देता यावा म्हणजे त्याचा विधायक वापर करण्याचे नियंत्रण समाजाच्या हाती असेल असे जर आपले म्हणणे असेल तर मानवी संस्कृती व समाजाला आपली जीवनदृष्टी ठरवावी लागेल. मानवाचे आपसी संबंध व मानवाचे निसर्गासोबतचे संबंध यांचा मूल्यात्मक आधार काय असावा याचा विचार करावा लागेल. निसर्गाहून आपण मोठे नाही तर त्याचा अविभाज्य भाग आहोत याची विवेकी जाणीव व विनय नसेल तर समाज आक्रमणकारी आणि हिंसक होत जाणार आहे याबद्दलची आपली जाणीव अधिकच तीव्र होत आहे.



४ ऑक्टोबर : जागतिक प्राणी दिन

औद्योगिक क्रांतीच्या काळात व नंतरही ही जाणीव जगात अनेकांना झाली. ही जाणीव आज अचानक होत आहे असे नाही. गांधीजींनाही त्याची कल्पना होतीच आणि म्हणूनच त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यापुरते स्वराज्याकडे पाहिले नाही. शोषणमुक्त न्याय व अहिंसक समाजाची वैश्विक रचना कशी असावी याचे प्रारूप दिले व तो विचार स्वतःच्या देश स्तरावर रुजविण्याचा आणि प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. भरगच्च पायावर असलेल्या एका टोकाप्रमाणे अधिकाराच्या उतरंडीची रचना स्वीकारण्यापेक्षा समुद्रातील लाटांप्रमाणे एकानंतर एक अशा अनाक्रमक, बहुतांशाने स्वावलंबी, केंद्रस्थानी व्यक्ती असणाऱ्या गावांचे आणि परस्परांशी सहकार्यातून उर्वरित गरजांची पूर्तता करणाऱ्या समाजाची व संस्कृतीची निर्मिती करण्याचे स्वप्न त्यांनी नागरिकांसमोर मांडले. असा समाज, निसर्गाच्या रचनेचे शास्त्र व नियम जाणून संयमाने व विनयाने जगणारा होता. विचारांचे बुरसटलेपण, कल्पनाशक्तीचा आळस, गरिबीचे समर्थन आणि विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विरोधात जगणे म्हणजे गांधीजींच्या विचारातील समाज अशी धारणा आज अनेकांच्या मनात अकारण आहे. माणसाची खरी सांस्कृतिक ओळख त्याच्या उपभोगकारी सामर्थ्यात नाही तर त्याच्या सर्वहितकारी जाणिवेत आहे असे गांधीजींना वाटे. त्यांचा यंत्रांना विरोध नव्हता पण करोडो लोकांच्या हातातून काम काढून घेणारी यंत्रे जर माणसांना स्वाभिमानाने व स्वावलंबनाने जगण्यापासून वंचित करणार असतील, निष्क्रिय व गुलाम बनविणारी असतील तर अशा यंत्रांचा वापर योग्य नाही असे त्यांना वाटे. त्यांच्या स्वप्न सृष्टीतील भारत व त्यातील मानवी संबंधाचे स्वरूप त्यांच्याच शब्दात बघायचे तर...




''गरिबातल्या गरिबालाही आपला वाटावा आणि ज्याच्या निर्माणात त्याच्या मताला महत्त्व राहील असा भारत निर्माण करण्याचा मी प्रयत्न करीन. मी असा भारत निर्माण करण्याचा प्रयत्न करीन की, जेथे उच्च-नीच वर्गांचा भेद राहणार नाही व जेथे निरनिराळ्या पंथांमध्ये पूर्णपणे सामंजस्य राहील. अशा प्रकारच्या भारतात अस्पृश्यता किंवा दारू आणि इतर नशेच्या वस्तूंना स्थान राहणार नाही. त्यात स्त्री-पुरुषांना समान हक्क राहतील. संपूर्ण जगाशी आमचा संबंध शांततामय असेल म्हणजेच आम्ही कोणाचेच शोषण करणार नाही, तसेच कोणाकडूनही शोषण होऊही देणार नाही, त्या अर्थी आमची सेना लघुतम राहील. ज्या हितसंबंधांचा मूक हितसंबंधांशी विरोध नसेल अशा हितसंबंधांचा मग ते देशी असोत किंवा विदेशी असोत, त्यांचा पूर्णपणे आदर केला जाईल. मी स्वतःपुरते तर असेही म्हणू शकतो की मला देशी व विदेशी यांमध्ये फरक करण्याचा तिटकारा आहे. हा माझ्या स्वप्नसृष्टीतील भारत आहे.''

आमच्या देशात अंग मेहनतीकडे तिरस्काराने पाहण्यास ज्या दिवशी सुरुवात झाली असेल, तो आमचा घातवार असावा. हिऱ्यासारख्या आणि ज्यांच्या भरवशावर आमचा देश जगतो आहे अशा करोडो माणसांना कनिष्ठ ठरविण्यात येऊन, वरपांगी मोठ्या दिसणाऱ्या मोजक्यांना आम्ही प्रतिष्ठित मानू लागलो

आहोत! परिणामी आमच्या देशाची दु:खद अशी आर्थिक आणि नैतिक दुहेरी अवनती झाली. त्यांपैकी कोणते नुकसान अधिक झाले हे सांगणे कठीण आहे.

ध्येय हे उच्चतम ठेवावे लागते. व्यवहारात आपल्या क्षमतांना मर्यादा असतात, याची विनयशील जाणीव आपल्याला असावी. गांधीजी विचार व आचारात पूर्ण ऐक्य आणण्याचा आटोकाट प्रयत्न करीत, यामुळे ते लोकांच्या दृष्टीने महात्मा झाले. त्यांना अपेक्षित असलेल्या समाजाकडे नेणाऱ्या शिक्षणाची दिशा ठरविणाऱ्या नई तालीमचे स्वरूप त्यांनी देशासमोर ठेवले. आताचे जग हे आपले आहे. आपण त्याकडे कसे बघतो, समाज परिवर्तनाच्या दिशेचा अर्थ कसा समजावून घेतो, त्याला कसा आकार देऊ इच्छितो हा पूर्णत: आपला प्रश्न आहे. पण गांधीजींचा विचार काय आहे हे समजून घेणे आपल्याला उपयोगाचे ठरू शकेल.

### नई तालीम : अहिंसक व्यवस्था परिवर्तनासाठी

गांधीजींच्या शिक्षण विचारांबद्दल चर्चा करायची ती केवळ एवढ्यासाठी की, ज्या प्रकारचा समाज आपण घडवू इच्छितो त्यानुरूप शिक्षणाची रचना करावी लागते. स्वाभाविकत: गांधीजींची नई तालीम शोषणमुक्त समाजाच्या निर्मितीचे ध्येय बाळगणारी, मन–बुद्धी–शरीर यांच्या संतुलित व सुसंवादित्व साधणाऱ्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील जीवनकेंद्री तालीम आहे. व्यक्तीतील सद्‌गुणांचा सर्वोत्तम विकास व जबाबदार नागरिकत्वाची जडणघडण अशा दोन्हींवरही नई तालीम भर देते. बालकांच्या नैसर्गिक अशा कृतिशील प्रेरणांचा विचार करून ही नई तालीमची योजना तयार झालेली आहे. जीवनोपयोगी हस्तोद्योगास केंद्रस्थानी ठेवत विविध विषयांच्या क्षमतांचा समवाय साधत शिकणे यात अभिप्रेत आहे. दक्षिण आफ्रिकेतील आपल्या शिक्षण प्रयोगांच्या आधारे हस्तोद्योग हे शिकण्याचे उत्तम माध्यम होऊ शकेल हे त्यांच्या ध्यानात आले होते. शारीरिक काम आणि कौशल्ये यांचा शास्त्रीय ज्ञानाशी समन्वय घडवून परिश्रम व परिश्रमी दोघांनाही ज्ञान व्यवस्थेत सन्मानाचे स्थान गांधीजी देऊ इच्छित होते, त्यास शास्त्रीय ज्ञानाची जोड देऊन त्यांचे सामाजिक व्यवस्थेतील बळ वाढवू इच्छित होते. शारीरिक श्रमापासून दूर, पण शब्द माध्यमाने समाजात प्रतिष्ठा मिळालेल्यांना त्यांच्या बांडगुळी जगण्याची मर्यादाही दाखवून देऊ इच्छित होते. ज्या देशात बहुसंख्य शेतकरी व श्रमिक आहेत, अशा देशात श्रमविन्मुख शिक्षण त्यांना स्वावलंबी जगण्यापासूनच नव्हे तर त्यांच्या नैसर्गिक संसाधनांवरील नियंत्रणापासूनही दूर नेते; आत्मसन्मानाने जगण्यापासून दूर नेते. श्रमविन्मुख जीवन हे श्रमिकाच्या शोषणावर आधारित आहे. त्यामुळे असे जीवन व असे शिक्षण दोन्हीही नाकारले पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते.

'हात, पाय, डोळे, कान, नाक इत्यादींचा योग्य वापर करून त्यांना प्रशिक्षित करूनच बुद्धीचा खरा विकास होऊ शकतो, किंबहुना तोच बालकांच्या बौद्धिक विकासाचा शीघ्रतम मार्ग होय.'' पुढे ते म्हणतात, ''बुद्धी व शरीर यांच्यासमवेत जर आत्म्याचा विकास झाला नाही तर बुद्धीच्या एकांगी विकासाने फारसा फायदा नाही. आध्यात्मिकतेचा मला अभिप्रेत असलेला अर्थ सहृदयतेचे शिक्षण.'

ज्ञानग्रहणाच्या निसर्ग, समाज आणि उद्योग या माध्यमांतून अध्ययन करीत विचारशील, चिकित्सक, नैतिक, निर्भय, परिश्रमी, सहयोगी, सहिष्णू, संयमी अशा व्यक्तित्वाची जडणघडण होणे नई तालीममध्ये अपेक्षित आहे. ओढूनताणून समवाय न करता अत्यावश्यक जागी अन्य पद्धतींचा उपयोग करण्याची मोकळीकही यात घेता येते. कला, संगीत, खेळ, व्यायाम यांना यात स्थान

आहे. मातृभाषेत शिक्षण मिळणे हा मुलांचा अधिकार आहे, ही नई तालीमची तात्त्विक भूमिका आहे. सर्वांना सक्तीचे व समान दर्जाचे शिक्षण मिळावे, हस्तोद्योग हा वैज्ञानिक दृष्टिकोनातून शिकविला/शिकला जावा या हेतूने विज्ञानासोबतच गणित, भूगोल, इतिहास, सामाजिक शास्त्रे इत्यादी विषय शिकविण्याची व्यवस्था या दृष्टीने समानता ठेवणारी असावी असे मानले असले, तरी भौगोलिकतेनुसार व कालसापेक्ष बदल करीत स्वावलंबी होऊन जगण्याला भिडण्याचे सामर्थ्य विकसित करणे हे उद्दिष्ट ठेवून नित्यनूतनत्व बाळगणारी असावी हे अपेक्षितच आहे. पाठ्यपुस्तक व परीक्षा यांच्या मर्यादांमध्ये न अडकता, शिक्षक व विद्यार्थी दोघांनाही सर्जनशील, अध्ययनशील व कृतिशील बनण्यास हा शिक्षण विचार प्रेरित करतो. या विद्यालयांचे संचालन लोकतांत्रिक पद्धतीने व्हायला हवे.

'तालीम का यह तरीका हिंदू, मुसलमान, पारसी, ईसाई, सभी के लिये एक-सा होगा । मुझसे पूछा गया है कि मै धार्मिक शिक्षा पर कोई जोर क्यों नहीं देता? वजह यह है कि मैं उन्हें स्वावलंबन का धर्म सिखा रहा हूँ, जो मेरे खयाल में सब धर्मों का असली रूप है।'

तसेच धर्म, जात, लिंग, वर्ण, वंश निरपेक्ष पद्धतीने कार्य करणे येथे अपेक्षित आहे. धर्म शिक्षणास यात जाणीवपूर्वक स्थान दिलेले नाही. स्व-कर्तव्यांची जाणीव हाच खरा धर्म आहे असे नई तालीममध्ये धर्म शिक्षणाबाबतचे मत विचारले असता गांधीजींनी स्पष्टपणे मांडले होते. गांधीजींना अपेक्षित असणाऱ्या व्यवस्थेतील शिक्षक व समाज हा साधे जीवन जगणारा होता. विद्यालयाद्वारे होणाऱ्या उत्पादक कामातून एका टप्प्यानंतर नियमित स्वरूपाचा खर्च भागावा ही अपेक्षा कामाची शास्त्रीयता, गुणवत्ता व स्वायत्तता या दृष्टीने बाळगलेली दिसते. अर्थात येथे विद्यालयाद्वारे निर्मित वस्तूंची खरेदी पुरेसा भाव देऊन शासनाने खरेदी करणे त्यांनी अपेक्षिले होते, पण त्याच वेळेस असे घडले नाही तर काय होईल असा धोका अनेकांनी लक्षात आणून दिला होता, त्यामुळे असा प्रयत्न व्हावा, पण अनिवार्यता नको ही भूमिका स्वीकारली गेली. नई तालीमचे शास्त्र व विचार विनोबांनी पुढे नेला, त्यावर प्रयोग केले व मार्गदर्शक लेखन केले. स्वतंत्र भारतात समाजाने मुलांच्या शिक्षणाची आर्थिक जबाबदारी घ्यायला हवी ही तात्त्विक भूमिका विनोबांनी घेतली, तसेच शिक्षकांनी समतेसाठी सदैव जागरूक व कर्तव्यदक्ष असावे यासाठी आचार्य कुलाची स्थापना केली. त्या अन्वये सरकारच नव्हे, तर सर्व प्रकारच्या आर्थिक व राजकीय सत्तेच्या दबावापासून मुक्तपणे व निर्भयपणे काम करण्यास शिक्षकांना प्रेरित केले.

### आजची तालीम कशी असावी हे आपणच ठरवायला हवे :

नई तालीमचा शिक्षण विचार जरी त्या काळात आपण सामाजिकदृष्ट्या स्वीकारू शकलो नाही, तरी आज आपण अशा जागी आलो आहोत की यातील तत्त्वे आपण आज दुर्लक्षणे आत्मघातक ठरेल असे वाटते. स्वतंत्र भारताचे संविधान बनले. संविधानिक मूल्यांच्या आधारे आपण समाज घडविण्यासाठी बद्ध आहोत, त्यासाठी आवश्यक असे संवेदनशील समाजमन घडले पाहिजे. गरीब-श्रीमंत यांतील दरी अधिकाधिक वाढवत नेणारी, बालकांवर अवेळी अमानुष स्पर्धा लादणारी, विशिष्ट वर्गाच्या व विशिष्ट प्रकारच्या ज्ञानाला अग्रक्रम देणारी अशी आत्यंतिक स्तरीय रचना निर्माण करून आपण लोकतांत्रिक समाजवादी रचनेकडे कसे जाणार आहोत? यासाठी कुणी कटिबद्ध व्हायचे आहे? सरकारने का समाजाने? उद्योगपतींनी, तंत्रज्ञानींनी की व्यावसायिकांनी? दुर्दैवाने आपण दुभंगलेल्या

समाजाच्या समतेच्या जाणिवा आजवर पुरेशा तीव्र करू शकलेलो नाही असेच म्हणावे लागते. समाजातील बळकट व बहुसंख्य लोक आपल्या स्वार्थासाठी कमजोर व अल्प संख्याकांना नियंत्रणात ठेवू इच्छितात की, आपल्या शक्तीचा उपयोग त्यांना समर्थ व निर्भय बनवून प्रेमाचे नाते जोडू इच्छितात याकडे आपल्याला आता बघायला हवे आहे.

आज डिजिटल तंत्रज्ञानाशिवाय जणू काही सर्वांना शिक्षण देताच येणार नाही अशी भूमिका बळकट होताना दिसत आहे. तंत्रज्ञान नाकारण्याचा मुद्‌दा नाही, पण मुलांच्या दृष्टीने त्याच्या हितावहतेचा, योग्य वेळी व योग्य काळी त्याच्या वापरावरील नियंत्रणाचा, मुलांच्या बौद्‌धिक व भावनिक स्वातंत्र्याचा, स्वास्थ्याचा विचार करून हे तंत्र आपण स्वीकारत आहोत ना याचा विचार केला पाहिजे. हे तंत्र सर्वांना समन्यायी पद्‌धतीने उपलब्ध होऊ शकते आहे का यात शिक्षकांची स्वायत्तता, प्रतिभा यांचा सन्मान आहे का असे अनेक प्रश्न आज आपल्याला भेडसावत आहेत. या तंत्रातील कल्याणकारी शक्तीचा, समतेचा प्रत्यय यावयाचा झाल्यास काय करावे लागेल याचा लेखाजोखा आधी न घेता हे तंत्र महत्त्वाची अध्यापन पद्‌धती म्हणून लादली जाणे, अथवा स्वीकारली जाणे किती बरोबर राहील याचाही विचार व्हायला हवा. माध्यमाचे आपल्याला इच्छुक दिशेने नेण्याचे सामर्थ्य किती व मर्यादा काय आहेत हे देखील आपण आता ठरवायला हवे.

या लेखाचाही हेतू इतकाच आहे की गांधीजींच्या १५० व्या जयंती निमित्ताने नई तालीमकडे आजच्या संदर्भातून पुन्हा नव्याने बघता यावे, त्यातील अहिंसक, सहयोगी मानवी संस्कृतीकडे जाण्याच्या वाटेवर आपली काही पावले पडावी, कितीही विपरीत परिस्थितीत हार न मानता 'एकला चलो रे' या विचारातील जिद्‌द आणि निर्भयता आपल्याला प्रेरणादायी ठरावी. गांधीजींनी म्हटल्याप्रमाणे 'सत्याग्रही होण्यापूर्वी सत्यग्राही होण्याची प्रामाणिकता व बळ आवश्यक' ही भूमिका आपण जोपासावी. असे घडले तर आपण आजवर गमावलेले बरेच काही साध्य करता येईल असे मनापासून वाटते.

समाजात अनेक लोक आजच्या व्यवस्थेतील उणिवांनी अस्वस्थ होऊन आपापल्या पातळीवर विविध क्षेत्रांत पर्याय शोधत काम करीत आहेत. शेती, पाणी, ऊर्जा, वस्त्र, शिक्षण, पर्यावरण, जंगल व्यवस्थापन, लोकतांत्रिक कार्यपद्‌धती यांसारख्या विभिन्न क्षेत्रांत आधुनिक ज्ञान–विज्ञानाची सांगड घालत विकल्प/ पर्याय उभे करीत आहेत. मोठी धरणे, मोठे रस्ते, मोठे कारखाने या सर्वांसाठी पर्याय उभे केले जाऊ शकतात हा विश्वास या क्षेत्रांतील अनेक प्रयोगांनी दाखवून दिला आहे, पण हे छोटे छोटे पथदर्शक पर्याय उभे करण्यात लावलेले आयुष्य वाया जाऊ नये. ही शक्ती आणि संविधानिक मूल्यांवर आधारित सर्वांच्या कल्याणाची तीव्र सामाजिक आस यांतून नव्या रचना आपण उभ्या करू शकतो हा आत्मविश्वास आपण बाळगला पाहिजे.

आनंद निकेतन हे नई तालीम समितीद्‌वारे (पूर्वीचे हिंदुस्थानी तालिमी संघ) सेवाग्राम येथे २००५ मध्ये गांधी विचारांची प्रेरणा घेऊन पुनर्स्थापित केलेले विद्यालय. आजच्या काळात या उद्‌दिष्टांनुरूप काम करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. मागील १५ वर्षांचा अनुभव पाहता असे शिक्षण अतिशय समृद्‌ध, आनंददायक आणि समाधानकारकही आहे याचा अनुभव घेत आहोत. शिक्षकांच्या प्रेरणांना साद घालणारे, व्यक्तिगत व सामूहिक शक्तीस आव्हान देणारे हे शिक्षण आज अनेक पटींनी आवश्यक झाले आहे, हे या निमित्ताने आवर्जून येथे नमूद करावेसे वाटते.

■■■



**७ ऑक्टोबर : अर्वाचीन काव्याचे जनक कवी केशवसुत जन्मदिन (१८६६)**

# अहिंसक समाजाच्या मुक्ततेसाठी नई तालीम

**प्रा. प्रभाकर पुसदकर**
नई तालीम समिती, सेवाग्राम वर्धा
भ्रमणध्वनी : ९७६३२२३६७०

'शिक्षण' मनुष्य जीवनाची मूलभूत गरज आहे. जीवनाची ती महत्त्वपूर्ण साधना आहे. शिक्षणाच्या माध्यमातून जीवनाचे लक्ष्यच निर्धारित केले जाऊ शकते किंबहुना जीवनातील गुंता, अडचणी, समस्या व प्रश्न सोडविण्याकरिता योग्य पर्याय व मार्ग दाखविले जाऊ शकतात म्हणूनच जीवनात आणि समाजात शिक्षणाची महत्त्वाची भूमिका आहे. ती सामाजिक अनुभवाद्वारे आणि कृतीतून शिकण्याची प्रक्रिया आहे. व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी ते आवश्यक आहे. महात्मा गांधीजींच्या मते, 'शिक्षण ही माणसावर दीर्घकाळ परिणाम करणारी प्रभावी प्रणाली आहे' म्हणून त्यांनी नई तालीमच्या रूपाने मूलभूत शिक्षणाची देणगी दिली आहे. याबाबत गांधीजी म्हणत ''नई तालीम राष्ट्राकरिता दिलेली माझी सर्वोत्कृष्ट देणगी आहे. नई तालीम म्हणजे जीवनासाठी, जीवनाद्वारे आजीवन शिक्षण होय.''

> *परिवर्तन हा काळाचा नियम आहे. परिस्थिती, ध्येय, धोरणे, पद्धती, दृष्टिकोन या सगळ्यांत काळानुरूप बदल होत जातो, पण काही बाबी त्रिकालाबाधित असतात. शिक्षण प्रणालीत अनेक बदल झाले, अजूनही होत आहेत, पण महात्मा गांधीजींच्या नई तालीम शिक्षण प्रणालीतील मूलभूत पाया आजही तोच असणार आहे. तो म्हणजे, प्रयोग, अनुभव आणि कृतीतून शिकणे. गांधीजयंती निमित्त त्यांच्या 'नई तालीम' शिक्षण प्रणालीविषयी...*

गांधीजींनी १९३७ मध्ये वर्धा येथे मारवाडी शिक्षण मंडळाच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित शिक्षण परिषदेत मूलभूत शिक्षणाचा प्रस्ताव तात्त्विक विवेचनासह मांडला. या परिषदेत सर्वानुमते पारित प्रस्तावानुसार राष्ट्र पातळीवर हिंदुस्थानी तालिमी संघामार्फत शिक्षणाचे व्यापक कार्य करण्यात आले. हिंदुस्थानी तालिमी संघाद्वारे डॉ. झाकिर हुसेन, एडवर्ड विलियम आर्यनायकम आणि आशादेवी यांनी मूलभूत शिक्षणाला नई तालीम च्या रूपाने मूर्त रूप दिले. नई तालीम ही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची व समृद्ध जीवनाची चिंता करणारी व्यवस्था आहे.

नई तालीम ही समाजातील कार्य, कृती आणि अनुभवजन्य माध्यमातून शिकण्याची कला व शास्त्र आहे म्हणूनच याला समाज आणि शिक्षण यांच्यातील एक मजबूत साकव असेही म्हणतात. विधायक कार्याद्वारे अहिंसक आणि स्वावलंबी समाज स्थापनेबाबत गांधीजींनी प्रासंगिकता जाणून घेतली आणि हस्तकौशल्य, विधायक कार्य व उद्योगमूलक (ग्रामोद्योग) कार्यातून समग्र शिक्षणाची व्यवस्था निर्माण केली, जी अहिंसक, चिरंतन सामाजिक उन्नती, न्याय, समता, स्वावलंबन व आत्मनिर्भर समाजाकरिता आवश्यक होती.

व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू समजून घेण्यासाठी आणि जीवनासाठी नवीन मूल्ये तयार करण्यासाठी **'शिक्षण'** हे एक समृद्ध असे माध्यम आहे. मानवी विकासात, सामाजिक सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी इतर व्यवस्थेपेक्षा शिक्षण प्रणाली

अधिक परिणामकारक आणि प्रभावी आहे. म्हणून ती एक जीवनाची महत्त्वपूर्ण साधना आहे.

वर्तमान शिक्षण प्रणाली पाश्चात्त्य शास्त्रज्ञ पाव्हालोव्ह, जॉन ड्युई, स्कीनर, पियाजे यांच्या मानसशास्त्रीय प्रयोग आणि तत्त्वांवर आधारलेली आहे. उद्दीपक आणि प्रतिसाद सिद्धांत (S-R theory), आमिष आणि शिक्षा (Reward and Punishment) या तत्त्वांचेच प्रचलन अधिक आहे. मुलांची नैसर्गिक शिकण्याची प्रक्रिया मात्र भिन्न आहे. त्या त्या वयोगटातील सर्व मुले जरी सारखी असली, तरी ती भिन्न व वेगळी आहेत. प्रत्येक मुलाचे स्वत:चे वेगळे व समृद्ध असे विश्व आहे. जिज्ञासा करून शिकणे, सतत दृढीकरण करणे व त्यातून जीवनाचा अर्थ लावणे, जीवनाची दिशा ठरविण्याकरिता विविध कौशल्ये आत्मसात करणे, क्षमता विकसित करणे, हुन्नरी व गुणी होणे असे चालू असते. मुलांच्या मूळ नैसर्गिक प्रेरणा व प्रवृत्तीचा साकल्याने विचार करणे गरजेचे असते. याबाबत सर्वांना संधी न्याय तत्त्वावर उपलब्ध करून देणे महत्त्वाचे असते. अशी संधी नई तालीम मध्ये अभिप्रेत आहे म्हणून नई तालीम जीवनाचा अर्थ शोधणारी व सतत नवे शोधणारी तालीम आहे.

### जीवन शिक्षण देणारी तालीम :

संघर्ष हा जीवनातील महत्त्वाचा भाग आहे. अपयश पचविण्याची, पराभव स्वीकारण्याची, सहकार्य आणि सहयोगाचे तत्त्व यांचे भान राखण्याची ही अनोखी शिक्षण प्रणाली आहे. त्यामुळे नुसते माहितीच्या आधारावर नव्हे; तर काम, ज्ञान आणि शहाणपणाच्या (Wisdom) आधारावर प्रश्नांची, समस्यांची, संकटांची उकल करणे व त्याचे समाधान विवेकी विचारावर विकसित करणे सुद्धा नई तालीमचे मुख्य कार्य आहे.

नई तालीम जीवन प्रवाहात येणाऱ्या अडचणी, संकटे यांच्यावर मात करण्याची क्षमता व दृढ इच्छा शक्ती (Will Power) निर्माण करण्याचे धडे देते. कामाच्या माध्यमातून ज्ञानाची निर्मिती आणि तेही उत्पादक व समाजोपयोगी काम, त्यामुळे व्यक्तीचा आत्मविश्वास वृद्धिंगत होतो. त्यामुळे समाजाशिवाय शिक्षण किंवा शिक्षणाशिवाय समाज ही कल्पनाच करता येत नाही कारण ते एकमेकांना पूरक आहेत. मानवी संबंधाचे निसर्गाशी नाते अधिक सुदृढ करणारी ही प्रभावशाली प्रणाली आहे म्हणून जीवनातील समग्रता या नई तालीममुळे येते. व्हिक्टर फ्रँकल यांच्या तत्त्वानुसार जीवनाचा अर्थ शोधणे म्हणजे प्रत्येक कामातून आनंद व समाधान शोधणे व प्राप्त करणे होय. उत्पादक कार्यातून कामाचा आनंद मिळतो, पण तेच काम सतत व निरंतर करीत राहिलो तर त्याचे समाधान प्राप्त होते. रोजच्या शिकण्या-शिकविण्यातून आनंद मिळतो.

### नई तालीमची पाच तत्त्वे :

गांधीजींच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे व विविध प्रयोगांनी हे सिद्ध केले आहे की, मन-बुद्धी, शरीर आणि आत्मा यांचा समग्र व एकीकृत विकास करणे गरजेचे असते. त्याला 3H (Head, Hand, Heart) असेही म्हणतात. मानसशास्त्रीय सिद्धांताप्रमाणे बौद्धिक (Cognitive), भावनिक (Affection) व शारीरिक बाबी (Motor) यांचा विकास करणे गरजेचे असते; पण त्या बरोबरच मानवी समाजातील अनेक महत्त्वाचे पैलू सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहेत. विविध प्रयोग आणि चिंतनाने नव्याने 2 H यात समाविष्ट करण्यात आले; ते म्हणजे आरोग्य व आदर (Health and Honour.)

### जीवन समृद्धीचे शिक्षण :

गांधीजी म्हणाले, ''मी म्हणेन की खेड्यांचा विचार नष्ट झाला तर भारतही नाहीसा होईल. भारत या पुढे भारत राहणार नाही. जर गावाचे पुनरुज्जीवन शक्य असेल तरच शोषण होणार नाही. मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरणामुळे ग्रामस्थांचे शोषण होऊ शकते



८ ऑक्टोबर : हिंदी लेखक प्रेमचंद मुन्शी स्मृतिदिन (१९३६)

कारण स्वतःच्या वापरासाठी उत्पादन हे गावाचे, स्वतःचे वैशिष्ट्ये आहे. जर खेड्यातील उद्योगाचे हे वैशिष्ट्य टिकवून ठेवले व ग्रामस्थ ते तयार करू आणि वापरू शकले तर अशी आधुनिक यंत्रे व साधने वापरण्यास हरकत नाही. फक्त त्यांचा वापर दुसऱ्याच्या शोषणासाठी केला जाऊ नये'' म्हणूनच उद्योगाद्वारे शिक्षण देणे गरजेचे आहे, गांधीजींनी ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देत उद्योगमूलक शिक्षणाचा पुरस्कार केला.

**नई तालीमचे मूलभूत आधारभूत घटक :**

- नई तालीम जीवन शिक्षण म्हणून परिभाषित आहे.
- मूल्य आधारित समाज निर्मिती.
- प्रयोग, अनुभव आणि कृतीतून शिकणे.
- ज्ञान आणि कामाचे अतूट नाते व संबंध
- स्वावलंबन आणि उपजीविकेची हमी
- मुक्तता व स्वातंत्र्य हे मूलभूत अधिकार
- क्राफ्ट व लहान उद्योगांद्वारे शिकणे.
- कार्य संस्कृती आधारित उत्पादक तंत्रज्ञानाचा वापर
- मातृभाषेतूनच प्राथमिक शिक्षण.

''सा विद्या या विमुक्तये'' या तत्त्वाप्रमाणे मुक्ततेचे शिक्षण, ज्यातून कला, अभिव्यक्ती, शोध, साधना, अस्तित्व आणि अस्मिता जोपासता येते. उत्पादक काम, आत्मविश्वास, स्वावलंबन आणि आत्मनिर्भरता यांना वाव देण्यास नई तालीममध्ये जागा (Space) आहे म्हणून बौद्धिक मुक्ततेकडे जाणारी मूलभूत वाट म्हणजे नई तालीम होय.

■■■

## शब्दकोडे

नंदा कुलकर्णी – भ्रमणध्वनी : ९०२८३४२७०४

खाली दिलेल्या लेखकांची नावे व सूचक माहिती यावरून रिक्त जागी अक्षरे लिहा.
गोलात येणारी अक्षरे क्रमाने एकापुढे एक लिहून पहा.

१) □ ○ कादंबरी

२) □ ○ □ □ □ आत्मचरित्र

३) ○ □ □ □ □ नाटक

४) ○ □ □ □ □ □ □ □ नाटक

५) □ □ ○ □ □ कविता संग्रह

६) □ □ ○ □ □ विनोदी कथा संग्रह

७) ○ □ □ □ □ ललित लेखसंग्रह

८) □ □ ○ □ □ ऐतिहासिक कादंबरी

○ ○ ○ ○ ○ ○ ○ ○


**सूचक :**

**लेखक** : प्रवीण दवणे, शिवाजी सावंत, नारायण सुर्वे, वि. वा. शिरवाडकर, माधवी देसाई, द. मा. मिरासदार, रणजित देसाई, वसंत कानेटकर

८ ऑक्टोबर : भारतीय वायुसेना दिवस (१९३२)

# लाल बहादूर शास्त्री

**डॉ. विशाल तायडे**
वरिष्ठ अधिव्याख्याता, जि. शि. व प्र. संस्था, औरंगाबाद.
भ्रमणध्वनी : ९४२२२१८१९८



भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मुगलसराय या ठिकाणी झाला. त्यांचे वडील शारदा प्रसाद श्रीवास्तव हे शिक्षक होते. ते लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे लाल बहादूर शास्त्री यांना कायमच संघर्षाला तोंड द्यावे लागले. गरिबी तर पाचवीलाच पुजलेली होती. मात्र त्यांनी शिक्षणाची कास कधीही सुटू दिली नाही. 'नन्हे' या टोपण नावाने लहानपणी ते ओळखले जात असत. शाळा आणि महाविद्यालयात एक हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांचे मूळ आडनाव श्रीवास्तव असे होते. मात्र बनारस विद्यापीठातून उत्तम प्रावीण्याने पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांना 'शास्त्री' ही उपाधी देण्यात आली. पुढे हेच नाव त्यांनी आपले आडनाव म्हणून लावण्यास सुरुवात केली.

*'जय जवान जय किसान' हा नारा देणारे लाल बहादूर शास्त्री हे भारताचे दुसरे पंतप्रधान. 'मूर्ती लहान पण कीर्ती महान' ही उक्ती सार्थ करणाऱ्या लाल बहादूर शास्त्रींनी देशहिताचे, लोकहिताचे अनेक निर्णय घेतले; म्हणूनच लोकमानसात त्यांचे स्थान अढळ आहे. मृदू स्वभावाच्या, पण खंबीर मनाच्या लाल बहादूर शास्त्रींच्या जन्मदिनाच्या निमित्ताने त्यांच्या आठवणींविषयी...*

बालपणापासूनच लाल बहादूर शास्त्री यांचा स्वातंत्र्य चळवळीकडे ओढा होता. सुरुवातीला ते लाला लजपत राय यांनी स्थापन केलेल्या 'लोक सेवक मंडळ' या संघटनेचे सदस्य झाले. मागास समाजाच्या प्रगतीसाठी त्यांनी या समाजाच्या माध्यमातून हिरिरीने प्रयत्न केले. पुढे ते या संघटनेचे अध्यक्षही झाले. त्यांच्यावर महात्मा गांधीजींच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. एका सभेत गांधीजींनी युवकांना भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत सक्रियपणे सहभागी होण्याचे आवाहन केले होते. शास्त्रीजी या सभेला उपस्थित होते. त्यामुळे ते स्वातंत्र्य चळवळीत सक्रियपणे सहभागी झाले. आंदोलनादरम्यान त्यांना तुरुंगवास देखील सहन करावा लागला.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली. उत्तर प्रदेशमध्ये पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर त्यांना राज्य मंत्रिमंडळातही घेण्यात आले. तेथे शास्त्रीजींना परिवहन विभागाची जबाबदारी देण्यात आली होती. त्या वेळी त्यांनी पहिल्यांदा महिला कंडक्टरची नियुक्ती करून अतिशय चांगला पायंडा पाडला होता. या काळात त्यांचे काम फार प्रभावी झाले. त्याची दखल घेऊन त्यांना केंद्र स्तरावरील जबाबदाऱ्या देण्यास

सुरुवात झाली. शास्त्रीजींनी तेथेही आपल्या कामाची चुणूक दाखविली. भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात रेल्वे आणि दळणवळण या खात्याची धुरा त्यांच्यावर सोपविण्यात आली. मात्र एका रेल्वे अपघाताची नैतिक जाबाबदारी स्वीकारून त्यांनी रेल्वे मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

मे १९६४ मध्ये पंडित नेहरूंचे निधन झाल्यानंतर पंतप्रधान पदाची जबाबदारी कोणावर सोपवावी असा प्रश्न निर्माण झाला होता. अशा वेळी सर्वांना मान्य होईल असे एकच नाव समोर आले, ते म्हणजे लाल बहादूर शास्त्री. अतिशय मृदू स्वभावाचे आणि सर्वांना सोबत घेऊन काम करण्यावर भर देणारे शास्त्रीजी मनाने अतिशय खंबीर होते. 'Hard work is equal to prayer' हे जणू त्यांच्या एकूण कारकिर्दीचे ब्रीदवाक्य होते. देशाच्या सुरक्षेबरोबरच त्यांनी देशातील प्रत्येक घटकाच्या विकासाला आपल्या ध्येयधोरणाचा मुख्य भाग बनविले. देशाची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घडी विस्कटू न देता भारताला सक्षमपणे जगात उभे करण्याचा हा कालखंड होता. लाल बहादूर शास्त्री यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने दूरदर्शीपणाने पावले उचलली. दुग्ध विकासासाठी सुरू केलेली 'दुग्धक्रांती' ही अशीच एक महत्त्वाकांक्षी चळवळ होती. सामान्य शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित अशी ही चळवळ मोठ्या प्रमाणावर विस्तारली. सरकारने देशात दुग्ध उत्पादन आणि त्याचे प्रभावी वितरण यांना प्रोत्साहन दिले. त्यातून देशात दुग्ध व्यवसायाची अतिशय सक्षम यंत्रणा उभी राहण्यास मदत झाली.

देशात अन्नधान्याची कमतरता निर्माण होत असल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी सर्व देशवासीयांना आवाहन केले की, आठवड्यात एक वेळ उपवास करून ते वाचलेले अन्न आपल्या गरजू देशवासीयांना द्यावे. विशेष म्हणजे असे आवाहन करण्यापूर्वी त्यांनी स्वतः हा उपवास केला आणि स्वतःच्या कुटुंबीयांना उपवास करण्यास प्रेरित केले. देशाने शास्त्रीजींच्या या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद दिला. या उपक्रमामुळे देशात सामाजिक सलोखा व बंधुभाव वृद्धिंगत होण्यास मदत झाली.

लाल बहादूर शास्त्री पंतप्रधान असतानाच सन १९६५ मध्ये भारत–पाकिस्तान युद्ध झाले होते. त्या वेळी त्यांनी 'जय जवान, जय किसान' असा नारा दिला होता. सैनिक या देशाचे संरक्षण करतात. त्यांच्यामुळेच आपण आपल्या घरी सुखाची झोप घेऊ शकतो. शेतकरी शेतात काबाडकष्ट करून, आपले पोट भरेल याची काळजी घेतो. सीमेवर जसा आपल्याला शत्रूचा धोका आहे; तर देशातला दुष्काळ हा ही आपला जीवघेणा शत्रू आहे. त्यामुळे सैनिक आणि शेतकरी या दोन्ही घटकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

या महाकाय देशातील प्रचंड लोकसंख्येला पुरेल असे अन्नधान्य उत्पादन होणे ही काळाची गरज आहे. शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि हा कणा मजबूत असणे हे सर्वांत महत्त्वाचे आहे, हे त्यांनी ओळखले होते. त्या दृष्टीने त्यांनी पावले उचलली. देशामध्ये 'हरितक्रांती' सुरू करण्यामागे त्यांची प्रमुख प्रेरणा होती. गव्हाच्या उत्पादनावर मोठ्या प्रमाणावर भर देण्यात आला. त्यातून पंजाब, हरियाना, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश अशा राज्यांमध्ये गव्हाच्या विविध जातींची लागवड करून प्रचंड उत्पादन घेण्यात आले. त्यातून अन्नधान्याच्या बाबतीत देशाला स्वयंपूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले.

भारताला जगात खंबीरपणे उभे करायचे असेल तर शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम अशी पिढी घडविणे आवश्यक आहे, अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे

**(पृष्ठ क्र. २७ वर)**

BRITISH COUNCIL

LearnEnglish Kids

# WORDSEARCH

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| E | N | G | L | I | S | H | V | Q | T |
| S | U | O | I | G | I | L | E | R | R |
| I | V | D | E | Y | B | V | A | M | N |
| S | C | I | E | N | C | E | M | H | Q |
| S | S | E | N | I | S | U | B | U | F |
| N | R | P | H | Y | S | I | C | A | L |
| D | F | N | I | I | M | A | T | H | S |
| A | J | T | C | F | C | N | S | U | I |
| Q | Y | R | O | T | S | I | H | E | B |
| G | E | O | G | R | A | P | H | Y | O |

**Answers** 1. art 2. geography 3. physical 4. religious 5. music 6. maths 7. science 8. business 9. history 10. english

1. This subject helps you paint and draw
2. You'll learn about different places in the world
3. Football and games in the gym are port of p------- education
4. You'll learn about different religions in r-------- education
5. You can learn to play an instrument in this lesson
6. You'll use a lot of numbers in this lesson
7. Biology, chemistry, physics are part of this
8. You'll learn about the world of work in b------- studies
9. You'll learn about things that happened in the past
10. Your favourite language!

You can play this game and more online at:
**www.britishcouncil.org/learnenglishkids**



११ ऑक्टोबर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्मृतिदिन (१९६८)


BRITISH COUNCIL
LearnEnglish Kids
TONGUE TWISTERS
Tongue twisters are difficult to say. How fast can you say it without making any mistakes?
"She sells sea shells by the sea shore."
You can play this game and more online at:
www.britishcouncil.org/learnenglishkids

# वाचन : एक ऊर्जा स्रोत

**डॉ. यशवंत पाटणे**
जि. सातारा
भ्रमणध्वनी : ९४२२६०६१७७

समता दिन, सद्भावना दिन, बाल दिन, शिक्षक दिन असे अनेक दिन आपण महापुरुषांच्या जयंतीशी जोडले आहेत. हेतू हाच आहे, ज्या मूल्यांसाठी त्या महापुरुषांनी आयुष्यभर योगदान दिले, त्यांचे स्मरण व्हावे आणि तसे आचरण घडावे.

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' साजरा केला जातो.

मला आठवते, सांगली येथील एका शाळेने एक अभिनव वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचे नाव होते 'डॉ. कलाम सर आपल्या भेटीला.'

शाळेत स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना डॉ. कलाम यांची पुस्तके आणि माहिती पुरवली होती. ती वाचून विद्यार्थ्यांनी स्वतः पाच मिनिटांचे मनोगत तयार करावयाचे आणि डॉ. कलाम यांच्या वेशात त्याचे सादरीकरण करायचे. त्यातून उत्कृष्ट वक्ता म्हणून ज्याची निवड होईल त्याला वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात 'डॉ. कलाम यांचा ग्रंथ' देऊन सत्कार करायचा.

> *साहित्यिक आपल्या प्रज्ञा प्रतिभेतून जे विचारधन निर्माण करतात, ते ग्रंथात साठविलेले असते. ते समाज जीवन प्रवाहित करते. मनाला प्रसन्नता देण्याचे व वृत्ती-प्रवृत्तींमध्ये परिवर्तन करण्याचे सामर्थ्य पुस्तकांतील अक्षरांमध्ये असते. थोडक्यात काय तर वाचनाने माणूस घडतो म्हणूनच पालक, शिक्षक यांनी पुढाकार घेऊन वाचनाची गोडी लागेल असे प्रयत्न जाणीवपूर्वक करायला हवे. त्यासाठी वाचकांना ग्रंथांची ओढ लागेल असे उपक्रम राबविण्याची गरज आहे. त्याविषयी...*

त्या दिवशी मला निवड झालेल्या वक्त्याचे मनोगत ऐकण्याचा योग आला. 'होय, मीच माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम...'

डॉ. कलाम यांची पुस्तके वाचल्यामुळे त्याच्यावर त्यांचा चांगलाच प्रभाव पडला होता. मोठ्या आत्मविश्वासाने आणि आवेशाने तो बोलत होता. जणू काही डॉ. कलाम प्रत्यक्ष छान संवाद साधत आहेत.

'आपली भारत भूमी ज्ञानसंपन्न भूमी आहे. ज्ञान हाच आपल्या संस्कृतीचा पाया आहे. ज्ञान सर्वत्र आहे. अनुभव, बुद्धी, माहिती आणि शिक्षण या चार गोष्टींद्वारे ते प्राप्त करता येते. ज्ञानाने संपन्न झालेली मने हाच राष्ट्राचा प्रखर ऊर्जा स्रोत असतो. मोठे ध्येय बाळगा. मोठी स्वप्ने बघा! एखाद्या विलक्षण ध्येयाने प्रेरित झाल्याशिवाय प्रगती करता येत नाही. गरीब असणे गुन्हा नाही, पण गरिबीवर मात करायची असेल तर ज्ञानाने श्रीमंत व्हा.'

तो विद्यार्थी वक्ता मधेच क्षणभर बोलायचा थांबला... सर्व श्रोते त्याचे भाषण ऐकण्यात दंग झाले होते. त्याने धीरगंभीरपणे एक सुंदर विचार मांडला.

‘आपण एक गोष्ट कायम लक्षात ठेवा. प्रत्येकामध्ये एक दैवी प्रकाशाची ज्योत तेवत असते. दुःख, अपयश, निराशेच्या अंधारात ती वाट दाखवू शकते. एकदा का त्या देवत्वाशी, ज्योतीशी तुमचे नाते जुळले की, तुम्ही मुक्तीच्या, आनंदाच्या, मनःशांतीच्या वाटेवरचे कायमचे प्रवासी होता.’

साऱ्या सभेने टाळ्यांचा कडकडाट करून त्या वक्त्याच्या विचारांना उत्स्फूर्त दाद दिली.

शाळेने साजरी केलेली डॉ. कलाम यांची जयंती मला खरोखरच ‘वाचनासाठी प्रेरणा’ देणारी दिवाळी वाटली.

कोणताही उपक्रम हा उपचार न होता, तो संस्कार सोहळा व्हावा यासाठी उपक्रमांना कल्पकतेची जोड दिली पाहिजे. वाचनाची अभिरुची वाढविण्यासाठी उमलत्या वयात मुलांच्या हाती चांगली पुस्तके दिली पाहिजेत. पुस्तकांच्या संगतीत रमलेली मुले देशाचे भविष्य उज्ज्वल करू शकतील. अशी मुले घडणे हेच ‘वाचन प्रेरणा दिनाचे’ फलित असेल.

प्रत्येक पिढीच्या आवडीनिवडी वेगवेगळ्या असतात. त्या काळानुसार बदलतात. आनंदासाठी जोपासले जाणारे छंदही वेगवेगळे असतात. ताणतणावातून मुक्त होण्यासाठी आवडीचे छंद जोपासले जातात. एकापरीने ते मनाची गुंतवणूक करीत असतात.

ग्रंथवाचन हे सुद्धा मनाची करमणूक करण्याचे आणि मन गुंतविण्याचे प्रभावी साधन आहे. हे साधन ज्यांच्या हाती असते ते वैचारिक दृष्ट्या सधन होतातच शिवाय ते समाधानी, आनंदी होतात. ग्रंथ हे त्यांचे खरे सोबती असतात. चांगल्या-वाईट प्रसंगात ते त्यांना मनोभावे साथ देत असतात.

आपण एखादा दिवस वस्त्र खरेदीने साजरा करतो, एखाद्या दिवशी हॉटेलमध्ये जाऊन सहकुटुंब भोजनाचा आनंद घेतो. हरकत नाही, पण एखादा दिवस आपण ग्रंथ खरेदीने साजरा करावा. कपडे काही दिवसांनी फाटून जातील, अन्न एका रात्रीत पचून जाईल, पण दर्जेदार ग्रंथ हे आपले आयुष्य कंटाळवाणे आणि निराशेत जाऊ नये म्हणून कायम प्रेरणा देत राहतील.

सध्या माणूस भौतिक आणि शारीरिक सुखासाठी धडपडतो आहे. उत्तम अन्न, उत्तम वस्त्र आणि उत्तम निवारा तुम्हांला शारीरिक सुख देईल, पण आत्मिक सुखाचे काय?

आत्मसुख देणारे ग्रंथ माणसाच्या अवतीभोवती असतात, पण ते त्याच्या नजरेच्या धाकात असतात. त्यांच्या त्यांच्या जागी ते गुपचूप पडून राहतात. त्यांनाही वाटत असते की, आपल्याला कोणीतरी मायेने हाती घ्यावे.

भाऊसाहेब खांडेकर यांनी त्यांच्या ‘हिरवळ’ या पुस्तकात छान लिहून ठेवले आहे,

‘पुष्कळदा सुख माणसाच्या अगदी जवळ हसत उभे राहिलेले असूनही तो दुर्मुखलेल्या चेहऱ्याने दूर क्षितिजावर त्याची सोनेरी पावले पुसट तर दिसतील या आशेने तिष्ठत उभा असतो.

सध्या आपल्याला प्रचंड अपेक्षांच्या वेडाने ग्रासले आहे. छोट्या छोट्या गोष्टीत आपल्याला सुख दिसतच नाही. अलिशान दिवाणखाना, सुसज्ज किचन, प्रशस्त डायनिंग टेबल, निसर्ग कवेत घेणारी गॅलरी, हातात महागडे मोबाईल अशा ‘प्रचंड अपेक्षा... आणि या गोष्टी आपल्याकडे नसतील तर जणू आपण दारिद्र्यरेषेच्या खाली जगत आहोत असे वाटते. या अशा प्रचंड अपेक्षांच्या नादात आपण साधेपणा आणि उत्कट आनंदच गमावत चाललो आहोत.

स्वप्न मोठी असावीत... घर, बंगला, गाडी, पगारही मोठा असावा. त्यात गैर काहीच नाही, पण असे काही

'प्रचंडपण' असेल तरच 'आपण सुखी' होऊ हा विचार मात्र माणसाचे समाधान हिरावून घेऊ शकतो. महागड्या वस्तू घराला घरपण देतील पण त्या घरातील ग्रंथ घरातल्या साऱ्यांना जगण्याचे समाधान आणि शहाणपण देऊ शकतील. यासाठी घरात देवघराबरोबरच एक ग्रंथघर असावे.

साहित्यिक आपल्या प्रज्ञा प्रतिभेतून जे विचारधन निर्माण करतात, ते ग्रंथात साठविलेले असते. ते समाज जीवन प्रवाहित करते. मनाला प्रसन्नता देण्याचे व वृत्ती–प्रवृत्तींमध्ये परिवर्तन करण्याचे सामर्थ्य पुस्तकांतील अक्षरांमध्ये असते. उत्तमोत्तम पुस्तके हेच आत्म्याचे सकस अन्न असते. त्या अन्नाची गोडी मुलांच्या मनात निर्माण करण्यासाठी पालकांनी, शिक्षकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे.

सध्याचे युग आधुनिक तंत्रज्ञानाचे आहे. मोबाईल, संगणक, इंटरनेट हे परवलीचे शब्द झाले आहेत. आजची पिढी त्यावर कमालीची अवलंबून आहे. बालपणी शाळा सुटते कधी आणि आम्ही खेळाचे मैदान गाठतो कधी. अशी आमची अवस्था व्हायची. दप्तर टाकले की, आईने दिलेला खाऊ उभ्या उभ्याच तोंडात कोंबून, आमचे पाय मैदानाकडे धावायचे. आता मात्र मैदाने मुलांची वाट पाहत असतात, पण मुलांना हात पाय हालविण्यापेक्षा हातात मोबाईल घेऊन गेम खेळण्यात मजा येते. एकट्यानेच हसणारी आणि 'मोबाईलमध्ये नको इतकी गुंतलेली मुले हा पालकांच्या चिंतेचा विषय झाला आहे. टी.व्ही., मोबाईल, संगणक ही साधने ज्ञानप्राप्तीसाठी काळाची गरज झाली आहे, पण ती गरजेपेक्षा अधिक वापरली जाणे हा काळजीचा विषय झाला आहे.

संत तुकोबांनी म्हटले आहे, 'गूळ सांडुनि गोडी घ्यावी.'

याचा अर्थ गूळ चाखावा पण गुळाच्या मोहात अडकून पडू नये. आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ जरूर घ्यावा. परंतु मनन प्रक्रियेला गती देणाऱ्या वाचन संस्कृतीपासून फटकून राहू नये.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात माणसा–माणसातील प्रत्यक्ष संवाद कमी होत चालला आहे. शुभेच्छांची घरभर फिरणारी पत्रे मोबाईलच्या सुलभ संवादामुळे बंद पडत चालली आहेत. माणूस गतीच्या आणि संपत्तीच्या चक्रात पुरता गुंतून गेला आहे. चंगळवादी वृत्ती वाढली आहे. त्यामुळे जीवन सौंदर्याला आणि संस्कृतीला तडे जात आहेत. मूल्यांचा ऱ्हास होत आहे. माणसांचा तोल ढळतो आहे. तो सावरण्यासाठी माणसाने ग्रंथ मैत्री जोपासली पाहिजे. ग्रंथांची संगत ही आत्मिक उन्नतीला पूरक असते.

गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी यांसारखे सांस्कृतिक उत्सव पारंपरिक पद्धतीने साजरे होतात. आम्ही सातारा येथील शिक्षक मंडळी दरवर्षी तत्कालीन शिक्षणाधिकारी आणि विद्यमान शिक्षण संचालक दिनकर पाटील यांच्या प्रेरणेतून 'ग्रंथ महोत्सव' साजरा करतो. गेली वीस वर्षे तो दिमाखाने साजरा होत आहे. कोट्यवधी रुपयांची ग्रंथ विक्री होते. हा महोत्सव 'वाचन संस्कृती'चे वैभव मानला जातो. हजारो मुले आपल्या शिक्षक व पालक यांच्या समवेत तेथे रंगून जातात. आपले वाढदिवस ग्रंथ खरेदीने साजरे करून 'वाचन संस्कृती' वाढवितात.

'मला आवडलेले पुस्तक' या विषयावर 'ग्रंथ महोत्सव'तर्फे विशेष वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जाते. एकाच वेळी उत्तम वाचक आणि अभ्यासू वक्ता घडविण्याचे कार्य येथे प्रत्येक वर्षी केले जाते.

कथाकथन, काव्यवाचन, सांस्कृतिक कलागुण दर्शन, परिसंवाद, व्याख्याने अशा बहरदार कार्यक्रमांमुळे

चार दिवस 'ग्रंथ महोत्सव'चा मांडव रसिकांच्या गर्दीने फुलून जातो. हीच गर्दी कार्यक्रमानंतर ग्रंथ दालनाकडे वळते. ग्रंथावर तुटून पडणारा वाचक, कोणाला पहायचा असेल तर त्यांनी जानेवारी महिन्यात साजऱ्या होणाऱ्या 'ग्रंथ महोत्सवात' ज्ञानाचा वारकरी म्हणून सामील व्हावे आणि वाचन संस्कृतीला उजाळा देणारे ते दृश्य डोळे भरून पाहावे. खरंच सांगतो, आपल्याकडे वाचकांची वानवा नाही, पण वाचकांना ग्रंथाकडे ओढून घेणाऱ्या उपक्रमांची गरज आहे.

'पुस्तकांच्या जगात शिरले की, मनावरचे मळभ दूर होते.' हे भाऊसाहेब खांडेकरांचे विधान अशा प्रकारच्या ग्रंथ महोत्सवाच्या वेळी प्रत्ययास येते.

काही वेळा वाचकांच्या स्पर्शाअभावी पुस्तके पोरकी राहतात. हे पोरकेपण दूर करण्यासाठी असे नवनवे उपक्रम ज्ञानसंस्थांनी राबविले पाहिजेत. शाळा, महाविद्यालये, वाचनालये, व्याख्यानमाला संयोजक इत्यादींनी यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

जीवन आनंदी करण्याचे अनेक मार्ग माणसाला उपलब्ध असतात, पण ग्रंथवाचन हा आत्मचैतन्य जागविण्याचा सुंदर ज्ञानमार्ग आहे.

दिव्यांची रोषणाई करून आपण दिवाळी साजरी करतो. ती वर्षातून एकदाच येते. आबाल वृद्धांना आनंद देऊन जाते, पण ग्रंथातील ज्ञानप्रकाशाने आयुष्य तर उजळून जातेच शिवाय निरंतर दिवाळीच्या आनंदाने तनमन मोहरून जाते.

'वाचन प्रेरणा दिन' हा मनामनातील विवेकदीप उजळविणारा अक्षर सोहळा व्हावा, हीच सदिच्छा आहे.

■■■

**(पृष्ठ क्र. २१ वरून)**

ज्ञानाच्या विविध क्षेत्रांतील गुणवत्तापूर्ण केंद्रे देशात सुरू व्हावीत यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता. त्यातून कृषी, शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग, खेळ अशा विविध क्षेत्रांतील राष्ट्रीय संस्था देशाच्या निरनिराळ्या भागात स्थापन करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. कर्नाटक राज्यातील कृष्णा नदीवर बांधण्यात आलेल्या प्रसिद्ध अलमट्टी धरणाचे काम त्यांच्या कारकिर्दीतच सुरू करण्यात आले.

देशाच्या प्रगती सोबतच त्याची सुरक्षाही महत्त्वाची बाब आहे, म्हणून शास्त्रीजींनी आपल्या कारकिर्दीत सुरुवातीपासूनच त्या दृष्टीने धोरणे आखायला सुरुवात केली होती. त्यांच्या काळात देशाच्या संरक्षण क्षेत्रासाठी आर्थिक तरतूदही वाढविण्यात आली. आपल्या शेजारच्या देशांशी मैत्रीचे संबंध असावेत, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असत. मात्र देशाच्या सुरक्षेबाबत कसलीही तडजोड करण्यास त्यांनी कधीही सहमती दर्शविली नाही.

१९६५ मध्ये पाकिस्तानने भारताच्या क्षेत्रात घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळी त्यांनी पंतप्रधान म्हणून अतिशय कठोर अशी भूमिका घेतली आणि पाकिस्तानला धडा शिकविला. त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तेव्हाच्या सोव्हिएत युनियनमधील (आताचे उझबेकीस्तान) ताश्कंद येथे ताश्कंद करार झाला. या करारावर स्वाक्षरी केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्या ठिकाणीच ११ जानेवारी १९६६ रोजी लाल बहादूर शास्त्री यांचे निधन झाले. त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' हा देशाचा सर्वोच्च सन्मान देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच लाल बहादूर शास्त्री यांच्या नावाने देशभरात अनेक महत्त्वाच्या संस्था उभ्या करून देशवासीयांनी त्यांच्या आठवणी कायम ताज्या ठेवल्या आहेत.

■■■

# वाचन संवाद

**राजीव तांबे**
भ्रमणध्वनी : ९३२२३९९८५९

आमच्या पिढीला वाचन विविध पातळ्यांवर अनुभवायची सवय बहुधा लहानपणापासूनच असावी. वाचताना मी अनेक गोष्टी पाहिल्या आहेत. आधी चित्र आणि शब्दांच्या मदतीने आणि नंतर केवळ शब्दांच्या मदतीने.

वेताळाच्या डेंकाली गावातील कवटी गुहा मी वेताळासोबत तर पाहिली आहेच, पण तिथे नगाऱ्यावरून दिले जाणारे संदेश पण वाचता वाचता ऐकले आहेत. सिंदबाद सोबत अनेक सफरीही केल्या आहेत.

'पॅपिलॉन' किंवा 'सत्तर दिवस' अशी पुस्तके वाचताना त्यातून नकळत सुरू होणारा अद्‌भुत सिनेमा वाचता वाचता पाहिला आहे.

अनेकानेक कथा, कविता, कादंबऱ्या आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर सर्वथा नव्यानेच भेटल्या आहेत, त्यातून प्रत्येक वेळी विलक्षण नवीन संदर्भ उलगडले आहेत. आजही जगताना प्रत्येक क्षणी अनेक लेखक, विविध पुस्तके, त्यातील नायक, नायिका, त्यातील संवाद, अनेकानेक प्रसंग माझ्यासोबतच आहेत कारण मी वाचता-वाचता पाहिले आहे, ऐकले आहे आणि पाहता-पाहता व ऐकता-ऐकता त्यांनीच मला कवेत घेतलं आहे.

> *मुलं वाचतात, पण आकलन झालेले नसते असे अनेकदा आढळून येते. नुसते शब्द वाचणे म्हणजे वाचन येणे नव्हे. काय वाचावे हे जसे महत्त्वाचे तसेच कसे वाचावे हेही महत्त्वाचे आहे. वाचन अनुभवले पाहिजे. वाचताना त्यातला आशय पाहता आला पाहिजे. वाचनानुभव सोबत घेऊन जगता आले पाहिजे. घरात वाचन संवाद सुरू झाला पाहिजे त्याविषयी...*

**बालसाहित्याचे किंवा साहित्याचे नेमके प्रयोजन काय?**

मुलांना शिकविणे, उपदेश करणे, तात्पर्य सांगणे, संस्कार करणे किंवा त्यांना घडविणे हे तर नव्हे आणि नव्हेच.

बालसाहित्याचे प्रयोजन आहे ते म्हणजे मुलांना दृष्टी देणे आणि मुलांना आनंद देत त्यांच्या विविध संकल्पनांबाबतच्या कक्षा रुंदावत नेणे. बालसाहित्य हे मुलांना शिकवीत नाही तर शिकण्याच्या अनेकानेक पद्धती, विविध पर्याय मुलांसमोर सहजी उलगडून ठेवते आणि मुलांना त्यांच्यातील सुप्त शक्ती व सर्जनशीलता यांची जाणीव करून देते कारण बालसाहित्याचा पाया हा 'मुलांना गृहीत धरणे' हा नसून 'मुलांवरचा अपार विश्वास आणि मुलांवर निरपेक्ष प्रेम' हा आहे.

आज मुले खरंच वाचतात का याचे उत्तर हो आणि होच आहे. पण प्रश्न असा आहे की, मुले वाचताना पाहतात का? ऐकतात का? आणि वाचनानुभव सोबत घेऊन जगतात का?



१७ ऑक्टोबर : व्याकरणकर्ते दादोबा पांडुरंग तर्खडकर स्मृतिदिन (१८८२)


आज कोणतीही साहित्यकृती यशस्वी होत आहे असे दिसू लागले की, तिच्यावर विविध माध्यमांतून बाजारू आक्रमण होते. उदाहरणच घ्यायचे झाले तर, हॅरी पॉटरच्या पुस्तकांची तडाखेबंद विक्री होऊ लागली आणि काही काळातच हॅरी पॉटरचे चित्रपट जगातल्या सर्व भाषांमध्ये झळकू लागले. त्याला पूरक म्हणून मुलांच्या टी-शर्टवर, पेनावर, चॉकलेटवर हॅरी पॉटर चमकू लागला आणि याचा मोठा दुष्परिणाम म्हणजे सगळ्या वाचकांना वाचताना एकच एक हॅरी पॉटर दिसू लागला. वाचताना 'आपला स्वत:चा हॅरी पॉटर' पाहण्याची क्षमताच दुबळी झाली. वाचताना मी काय पाहायचे हे इतरच ठरवू लागले.

आपण मुलांना वाचताना त्यांना त्यांच्या नजरेतून पाहायला, त्यांच्या कल्पनेने शोधायला उद्युक्त करायचे आहे. पुस्तक जरी एकच असले तरी प्रत्येक वाचक मुलाला त्यातून त्याचा स्वत:चा सिनेमा पाहायला मिळायला हवा.

आणि जर मुले वाचत नसतील तर याला जबाबदार कोण? न वाचण्यासाठी सर्वस्वी मुलांनाच जवाबदार ठरवणं अन्याकारकच होईल. मुलांचे वाचन आणि त्यांचे शिकण्याचे माध्यम यांचा जवळचा संबंध आहे. मातृभाषा आणि परिसर भाषा एकच असेल आणि मुलांचे शिकण्याचे माध्यमही तीच भाषा असेल तर त्या मुलांचे वाचन अधिक होते. घरात आणि समाजात तो ती भाषा सतत ऐकत असतो आणि चुकांची पर्वा न करता तो बोलतही असतो. नवनवीन संकल्पना समजून घेत असताना त्याची शब्दसंख्या वाढत जाते. जसजशी शब्दसंख्या वाढते तसतसा त्याचा आत्मविश्वास दुणावतो. त्याची विचार करण्याची भाषा आणि त्याची अभिव्यक्तीची भाषा यांचा घट्ट समन्वय साधला जातो. यामुळेच त्याला जे म्हणायचे आहे ते तो त्याच्या भाषेत, त्याच्या शब्दांत बिनचूकपणे मांडू लागतो आणि नेमक्या त्याच क्षणी जर त्याच्या हाती पुस्तके आली तर तो उत्तुंग भरारी घेतो. याठिकाणी आपली जबाबदारी वाढते. मुले पुस्तकांपर्यंत पोहोचू शकत नसतील तर आपण मुलांकडे पुस्तके घेऊन जायला हवे आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे आपणही मुलांसोबत वाचन केले पाहिजे. मुलांसोबत आपण वाचलेल्या पुस्तकांविषयी बोलले पाहिजे तरच मुले त्यांनी वाचलेल्या पुस्तकातील गोष्टी मोकळेपणाने तुमच्यासमोर उलगडू लागतात. यातूनच घरात वाचन संवाद सुरू होतो आणि एकदा का घरात वाचन संवाद सुरू झाला की, मुले आपोआपच टीव्हीपासून दूर जातात कारण ती आता वाचता वाचता पाहू लागलेली असतात.

घरात वाचन संवाद सुरू करा आणि होणारा बदल आम्हांला जरूर कळवा.

■■■



मी वाचलेल्या सर्व पुस्तकांची आठवण माझ्या मनात जपून ठेवलेली असली, तरी माझी सर्वाधिक आवडती काही पुस्तके आहेत. त्यातील एक लिलियन आयश्यर वॅटसन यांनी संपादित केलेले लाईट फ्रॉम मिनी लॅम्प्स. १९९३ सालापासून हे पुस्तक माझा मित्र आहे. बऱ्याच वेळा ते फाटले मात्र मी बाईंडिंग करून पुन्हा पुन्हा वापरले. माझ्यासमोर काही समस्या उभी ठाकते तेव्हा तेव्हा मी पुस्तक उघडतो आणि ते माझे अश्रू पुसते. माझे मन जेव्हा सैरभैर होते, तेव्हा तेच पुस्तक मला समतोल विचार करायला लावते.



**- डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम**

# वाचन संस्कृतीचा विकास : काळाची गरज

**गो. रा. तायडे**
निवृत्त प्राध्यापक
भ्रमणध्वनी : ९८६०९०९१७९

भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर हा प्रत्येक वर्षी आपण वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करतो. दुर्दम्य इच्छाशक्ती आणि ज्ञानार्जनाची आवड असणाऱ्या डॉ. कलाम यांना अगदी बालपणापासूनच वाचनाची गोडी लागली होती. या सवयीचा पुढे आयुष्यात आपल्याला खूप फायदा झाला, याचा ते नेहमी उल्लेख करीत असत. त्यांचा नेहमीच हा आग्रह असे की, विद्यार्थ्यांनी खूप वाचन केले पाहिजे.

डॉ. कलाम हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. अभ्यासूवृत्ती आणि कणखर मन असलेल्या डॉ. कलाम यांनी आम्हां भारतीयांना उज्ज्वल भविष्याचे स्वप्न दाखविले. ते नेहमी म्हणत की, आपला देश तरुणांच्या भरवशावरच प्रगतीच्या महामार्गाकडे मार्गक्रमण करू शकतो. त्यासाठी शाळा–कॉलेजपासून सक्षम युवा पिढी घडविण्यासाठी प्रयत्न करायला हवे. ते स्वतः विविध शैक्षणिक संस्थांमधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असत. 'देशाचे भवितव्य तुमच्या हातात आहे आणि देश घडण्यासाठी आधी तुम्ही घडायला पाहिजे' असा मोलाचा सल्ला ते देत असत. शरीराच्या सुदृढतेसाठी जशी अन्नाची आवश्यकता असते, तशी मनाच्या मशागतीसाठी वाचन महत्त्वाचे असते. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेपुरते वाचन न करता चौफेर वाचनावर भर दिला पाहिजे. त्यातून विविध जीवनानुभव तर आपल्याला मिळतातच, पण एक माणूस म्हणून जगताना तारतम्याने आयुष्याकडे बघण्याची दृष्टीही प्राप्त होत असते. तसेच आपल्या चिंतनाला खतपाणी घालण्याचे कामही वाचनातून होते. त्यातून व्यक्तीच्या विचारक्षमतेचा विकास होतो. जितक्या विविध प्रकारच्या विषयांचे आपण वाचन करीत जाऊ, तितकी आपल्या ज्ञानात भर पडत जाते. त्यामुळे वाचन हे आपल्या प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचे एक अविभाज्य अंग असले पाहिजे.

> *शेतीची मशागत चांगली केली की, बी चांगले रुजते आणि पीक चांगले येते. मनाचेही असेच आहे. वाचनाच्या आधारे त्याची मशागत केली तर व्यक्तिमत्त्व विकसित होते. सद्विचारांची पेरणी सहज होते. दृष्टिकोन सकारात्मक होतो. चांगल्या–वाईटाची पारख करता येते. सर्जनशीलतेला धुमारे फुटतात आणि जीवनाचा भरभरून आनंद घेता येतो. यासाठी गरज आहे वाचन संस्कृती वाढीला लागण्याची. त्याविषयी...*

आपले विद्यार्थी हे विचारी आणि ज्ञानसंपन्न झाले पाहिजेत. त्यासाठी प्रत्येकाने स्वतःला वाचनाची सवय लावून घेतली पाहिजे. अभ्यासक्रमाच्या पुस्तकांसोबतच अवांतर वाचनाची सवय लागणे आवश्यक आहे. त्यातून आपल्या ज्ञानाची वृद्धी होते. आपल्यात चौकस वृत्ती निर्माण होते. जी आपल्या विकासाला पोषक असते.

पूर्वीच्या तुलनेत अलीकडे वाचन कमी झाले आहे. ही परिस्थिती समाजाच्या सर्व घटकांमध्ये दिसून येते. पूर्वी अगदी सहजतेने पुस्तके मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे वाचनालय असायचे, मात्र काळाच्या ओघात तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबरच पुस्तके ई–बुक स्वरूपात उपलब्ध झाली आहेत. अगदी हातातल्या मोबाईलवर शेकडो पुस्तके उपलब्ध होऊ शकतात. तरीही समाजातील वाचनाची



१९ ऑक्टोबर : चंद्रशेखर सुब्रम्हण्यम् जन्मदिन (१९१०)

आवड कमी झालेली दिसून येते. आज आपले वाचन समाज माध्यमावरील पोस्टपुरते मर्यादित झालेले आहे की काय असा प्रश्न पडतो. आपल्यातील बहुतांशी लोकांचे वाचन फेसबुक आणि व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवरील मजकुरापर्यंतच सीमित झाले आहे. त्यामुळे मूलभूत आणि सकस साहित्याकडे आपण वळत नाही. पर्यायाने आपल्या बुद्धीची पुरेशी मशागत होताना दिसत नाही. आपण प्रत्येकाने याचा गांभीर्याने विचार करायला हवा. 'वाचाल तर वाचाल' यासारखी घोषवाक्ये केवळ शाळेच्या भिंतींवर लिहून भागणार नाही तर ती प्रत्यक्ष व्यवहारात आली पाहिजेत.

शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी यासाठी शाळेने सातत्याने विविध उपक्रम हाती घ्यायला हवेत. शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये व इतर संस्थांनी आपल्या परिसरात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम वाचन कट्टा निर्माण करावा, जेणेकरून कामकाजाच्या व्यतिरिक्त फुरसतीच्या वेळात विद्यार्थी, शिक्षक आणि इतर कर्मचारी वाचन करू शकतील. या निमित्ताने आपल्या कार्यक्षेत्रात वाचन चळवळ सुरू होण्यास प्रेरणा मिळू शकेल.

दरवर्षी हा दिवस कसा साजरा करावा याबाबत शासन स्तरावरून सूचना प्राप्त होत असतात. त्या अनुषंगाने शिक्षण संस्थांनी नियोजन करणे अपेक्षित असते. यावर्षी कोविड-१९ च्या परिस्थितीमुळे नेहमीसारखा हा दिन आपल्याला प्रत्यक्षात विविध कार्यक्रम आयोजित करून साजरा करता येणार नाही. मात्र हा दिन साजरा करण्यामागचा जो मूळ उद्देश आहे, तो आपण सर्वांनी समजावून घेतला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय रुजावी यासाठी त्यांना विविध प्रकारच्या साहित्याचे वाचन करण्यास प्रेरणा देणे गरजेचे आहे. सध्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, युनिसेफ आणि प्रथम बुक्स, स्टोरी विवर यांच्या मार्फत विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी 'गोष्टींचा शनिवार' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या राज्यव्यापी वाचन कार्यक्रमाच्या माध्यमातून इयत्ता पहिली ते आठवीच्या शिक्षकांना दर शनिवारी व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर आपल्या विद्यार्थ्यांना शेअर करण्यासाठी, विशेष निवड केलेली, योग्य वाचन पातळी व योग्य इयत्तेनुसार आणि सुंदर चित्रे असलेली मनोरंजक गोष्टींची पुस्तके डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. असे उपक्रम वाचन संस्कृतीच्या विकासाला पोषक आहेत. तथापि आपल्या सर्वांच्या माध्यमातून ही पुस्तके जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

वाचन संस्कृतीच्या विकासामध्ये पालकांचीही भूमिका फार महत्त्वाची आहे. ज्या घरातील ज्येष्ठ व्यक्तींना वाचनाची आवड असते, त्या घरात अगदी सहजतेने मुलेही वाचनाकडे वळलेली दिसून येतात. त्यांनाही वाचनाची आवड लागते. मुले अनुकरणप्रिय असतात. त्यामुळे वाचन संस्काराची सुरुवात आधी मोठ्यांपासून झाली पाहिजे.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी त्यांना आवडणारे वाचन साहित्य उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आपल्या शाळांमधील ग्रंथालये विविध विषयांवरील पुस्तकांनी समृद्ध असावीत, असे शासनाचे प्रयत्न असतात. त्या दृष्टीने अनेक उपक्रमांच्या माध्यमातून शाळेत पुस्तके कशी उपलब्ध होतील याकडे लक्ष दिले जाते. आवडणारी पुस्तके उपलब्ध झाली तर विद्यार्थी ती वाचतात असा अनुभव आहे. अनेक शाळांमध्ये वाचन संस्कृतीच्या विकासासाठी शिक्षकही प्रयत्न करीत असतात. त्यामुळेही विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागलेली दिसून येते.

बालकांना पुस्तकांची, वाचनाची गोडी लागण्यासाठी विविध स्पर्धांत यशस्वी होणाऱ्यास पारितोषिक म्हणून किंवा वाढदिवसाला भेट म्हणून पुस्तक देण्याचा उपक्रमही प्रेरणादायी आहे. सध्याच्या काळातही वाचनावर आधारित प्रश्नमंजूषा, निबंध लेखन, पुस्तक परिचय असे उपक्रम मुलांसाठी घेता येतील. अशा उपक्रमांचा वाचन संस्कृतीच्या विकासासाठी उपयोग होईल हे निश्चितच.

■■■

# वाचन संस्कृतीचा प्रसार

**शशिकांत शिंदे**
आरण्यक, पाटीलबा नगर, मु. पो. कोल्हार,
ता. राहाता, जि. अहमदनगर
भ्रमणध्वनी : ९८६०९०९१७९

'वाचन' ही मनाचं भरणपोषण करणारी चिरंतन व्यवस्था आहे. शरीराला जशी अन्नाची तशीच मनालाही वाचनाची आवश्यकता असते. वाचन म्हणजे केवळ कागदी लगदा पचवणे नव्हे. अक्षरांवरून धावणाऱ्या नजरेचा लगाम हाती असायला हवा. जे वाचतोय त्याची पार्श्वभूमी माहीत असेल तर वाचनाची खुमारी आणखीनच वाढत जाते. जिथे आकलन संपते तिथे दुर्बोधता सुरू होते. त्या सीमारेषेवर उभे राहता आले पाहिजे. या विश्वाचा शोध घ्यायचा असेल तर मनाचा तळवट तयार असायला हवा. सगळी सुखदुःखे, आनंद, पराभव, प्रेम, असूया ही जीवनाची परिमाणं आहेत. ती प्रमाणित करून घ्यायची असतील तर वाचनाचा छंद जोपासायला हवा. आपल्या उद्योग व्यवसायातून जीवनाच्या भाकरीची व्यवस्था होते परंतु मन तळमळत असते. त्याला झुलू द्यावे छंदांच्या विशाल प्रतलावर. ते सजग असेल तर त्याला शुद्ध स्वर सापडतील. रेषांच्या नजाकतीत ते हरवून जाईल किंवा शब्दांच्या ओढीने आनंदाची न संपणारी वाट चालत जाईल. वाचन ही अशी जीवनाला समजून घेता घेता जगणे समृद्ध करणारी अफलातून गोष्ट आहे.

> *आजी-आजोबांकडून गोष्टी ऐकण्यात ज्यांचे बालपण गेले, राजाराणीच्या, पऱ्यांच्या, राक्षसांच्या गोष्टी वाचण्यात जे शालेय जीवनात रमले, ज्यांना वाचनाची गोडी लागली आणि पुस्तके ज्यांचे सवंगडी बनले त्यांची व्यक्तिमत्त्वे सर्वांगांनी बहरल्याची, विकसित झाल्याची किती तरी उदाहरणे आपण अवतीभोवती पाहतो. त्यांचा आदर्श समोर ठेवत, आपल्याही विद्यार्थ्यांवर वाचन संस्कार करण्याची, वाचन संस्कृती वाढविण्याची गरज आहे. स्वानुभवातून मांडलेल्या या वाचन संस्कारांविषयी...*

पूर्वी घरात आजी-आजोबा असायचे. एकत्र कुटुंब पद्धतीत जीवनाची निकोप वाढ व्हायची. आजी गोष्ट सांगायची. परंपरेने चालत आलेल्या, तिने तिच्या आकलनातून जुळवलेल्या, ऐकीव अनुभवाच्या ऐवजातून तयार झालेल्या गोष्टींचा खजिनाच तिच्याकडे असायचा. प्रत्येक गोष्टीचा एक संस्कार होता. त्या स्फटिकांनी मनाचे निवळीकरण होत असे. शुद्धीकरणाचे हे कारखाने बंद झालेत. घरात माणसांचा वावर नसल्याने मुले एकलकोंडी झाली आहेत. करिअरच्या वरवंट्याखाली दबल्याने त्यांची उरली सुरली जीवनेच्छाही संपुष्टात येत आहे. आजीच्या गोष्टींनी ज्या मुलांचा भूतकाळ भरलेला आहे त्यांनी वर्तमानाची शिडी करून भविष्याला गवसणी घातलेली आहे. आजीच्या गोष्टींनी संस्कारित झालेल्या मनांना पुढे वाचन आपसूक आकृष्ट करते. ही पायाभरणी पक्व असेल तर वरची इमारत आपोआप देखणी होत जाते. आजी-आजोबांना घरात स्थान नसणे हे वाचन संस्कृतीच्या मुळावर घाव घालण्यासारखे आहे.

मला माझ्या घरातूनच वाचनाची दिक्षा मिळाली. राजा-राणीच्या, राक्षसांच्या अद्भूत गोष्टी मला खूप आवडायच्या. चांदोबा मासिकात त्या सगळ्या गोष्टी सापडायच्या. चांदोबानेच माझ्या वाचनाचा श्रीगणेशा

झालेला आहे. त्यातल्या गोष्टी आणि चित्रांनी माझ्या मनाची मशागत केलेली आहे. अभ्यास झाल्यावर मी हळूच चांदोबा उघडत असे. त्या स्वप्नील दुनियेत मग हरवून जात असे. सभोवतालला विसरून मी नकळत चांदोबात शिरत असे. आता मी राजा असे, प्रधान किंवा राक्षसही. त्या सगळ्या पात्रांच्या भूमिकेत शिरून मी तो काळ नेणीवेच्या पातळीवरून अनुभवलेला आहे. त्याचा एक घट्ट संस्कार झाल्याने पुढे वाचनाच्या अनेक पाऊलवाटा धुंडाळता आल्या. त्या धूळभरल्या पाऊलवाटांनी जगण्याचा अपरिमित आनंद माझ्या पदरात टाकला. अजूनही त्या वाटा कधी हाकारतात. एखादे अद्‌भुत गोष्टींचे पुस्तक उघडून मी परकाया प्रवेश करतो. त्यासाठी आत दडलेल्या लहान मुलाला मी जागे ठेवलेले आहे. अनिमिष नेत्रांनी सगळे टिपून मी पुन्हा या वास्तविक दुनियेत परततो. वाचनाने माझ्या भूत-भविष्य आणि वर्तमानाला असे कवेत घेतलेले आहे.

'कुठलंही वाचन कधीच वाया जात नाही', असे सांगणारे सेंट्रल बँकेतील एक अधिकारी डिक्शनरी सुद्धा कादंबरीसारखी वाचायचे. वाचनानेच माणसाची जडणघडण होत जाते. त्या परिपक्वतेतून काही सुंदर गोष्टी उमलतात. हातात लेखणी येते आणि मनातला कोलाहल, अनुभवविश्व कागदावर उतरवले जाते. डोळस वाचनानेच हे होऊ शकते. वाचनाचा छंद जडला की, सर्जनाच्या वाटा खुल्या होत जातात. वाचन, लेखन हे अधिकाधिक माणूस होण्याच्या प्रक्रियेतले पहिले पाऊल आहे.

वाचनामुळे संपूर्ण आयुष्य बदलल्याची कितीतरी उदाहरणे आपल्या समोर येतात. हे थोडेसे नैसर्गिक उपचारांसारखे आहे. झाला तर फायदाच. तोटा अजिबातही नाही. वर्तमानपत्रांच्या रविवार पुरवण्यांतून पुस्तकांची परीक्षणे येतात. मग सुरू होतो त्या पुस्तकांचा शोध. त्यांच्या मागावरच राहावे लागते. ते हाती लागल्यानंतरचा आनंद काही और असतो. कधीकधी रद्दीच्या दुकानातही काही चांगला ऐवज सापडतो. श्री. ना. पेंडसे यांचे 'हद्दपार' हे पुस्तक तिथेच सापडले. त्या पुस्तकाने मला खूप आनंद दिला. पुस्तके विकत घेऊन वाचायला मला आवडतात. त्यामुळे माझ्या घराचे बऱ्यापैकी वाचनालय झालेले आहे. कितीतरी दर्जेदार नियतकालिकांची वर्गणी मी भरलेली आहे. त्यांची एखाद्या जिवलगासारखी वाट पाहणे आणि हातात पडल्यावर त्यांचा आस्वाद घेणे या गोष्टी रोजच्या जगण्यात अलगदपणे मिसळून गेलेल्या आहेत. वाचत राहावे. तेच आपल्याला शिकवीत राहते. समरसून जगायला उद्युक्त करते. जगभरात ज्या अत्युत्तम गोष्टी आहेत त्यात वाचनाचा अंतर्भाव आहे. हे जग अधिक सुंदर करायचे असेल तर वाचनाला पर्याय नाही. जगच कशाला स्वतःला समजून घेण्यासाठीसुद्धा वाचनाची सवय अंगी बाणवायला हवी. हा आत्मशोधच नव्या जगाच्या उभारणीकरता उपकारक ठरणार आहे. वाचन संस्कृतीचा प्रसारच या विश्वाचा तारणहार आहे.

■■■

---


## वर्गणीदारांसाठी सूचना

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे. आपली वर्गणी **'संपादक, जीवन शिक्षण, पुणे ३०'** या नावे **'स्टेट बँक ऑफ इंडिया'**च्या कोणत्याही शाखेत बचत खाते क्र. **11153675105** मध्ये भरावी. बँकेत पैसे भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत, स्वत:चा पूर्ण पत्ता, (पिनकोड द्यावा.) मोबाईल नंबर व ई-मेल आयडीसह पोस्टाने अथवा ई-मेलने jeevanshikshan@maa.ac.in वर पाठवावी. 'जीवन शिक्षण'ची वार्षिक वर्गणी अथवा पुस्तके मागणीसाठीचे पैसे मनीऑर्डरनेही स्वीकारले जातील.

# वाचू आनंदे

**डॉ. नीतू गावंडे**
वरिष्ठ अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नागपूर
भ्रमणध्वनी : ९८८१०१८४३९

भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती थोर शास्त्रज्ञ, लेखक, मिसाईल मॅन, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे प्रगत भारताचे स्वप्न साकारण्यासाठी १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिन 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो.

देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वत:ला समृद्ध कशी करेल आणि त्यायोगे देश कसा शक्तिशाली होईल, हाच विचार डॉ. अब्दुल कलाम नेहमी करीत असत. डॉ. अब्दुल कलाम हे मुलांचे लाडके व्यक्तिमत्त्व ज्यांना वाचन व लेखनाची खूप आवड होती. डॉ. कलाम कायम मुलांमध्ये रमलेले असत. त्यांची बहुतांश पुस्तके ही विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी आहेत. कोणताही देश त्या देशातील शाळांच्या वर्गामध्येच घडतो, असे त्यांचे ठाम मत होते.

> *एक काळ असा होता की, आवडता छंद कोणता असे विचारले की, बहुतेकांचे उत्तर वाचन असे यायचे. वाचन हा छंद असा आहे की, मनोरंजन आणि ज्ञान या दोन्ही गोष्टी साधतात. वाचनाची महती कोणीच नाकारत नाही, पण वाचनाची गोडी कमी होत चालली आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. 'वाचू आनंदे' असे वाटेल असे उपक्रम राबविण्याची नितांत गरज आहे. वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यामागे हीच भूमिका आहे त्याविषयी...*

डॉ. अब्दुल कलाम यांना आदरांजली म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने एक पुस्तक वाचण्याचा संकल्प करावा, त्याला वाचनाची प्रेरणा मिळावी आणि त्यातूनच त्याला वाचनाची सवय लागावी हा उद्देश ठेवून राज्य शासनाने 'वाचन प्रेरणा दिन' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. दरवर्षी महाराष्ट्रातील सर्व शाळा, महाविद्यालयांमध्ये हा दिन साजरा करण्यात येतो. या दिवशी विद्यार्थ्यांनी आनंदाने आणि आवडीने छोट्या छोट्या पुस्तकाचे वाचन करावे असे अभिप्रेत आहे.

*'दिसामाजी काहीतरी ते लिहावे,*
*प्रसंगी अखंडित वाचीत जावे'*

अशा शब्दांत समर्थ रामदास स्वामी वाचनाचे महत्त्व सांगून जातात. वाचनामुळेच कोणतीही व्यक्ती विचारांनी समृद्धी होत असते. वाचनातून बालकांचा शब्दसंग्रह वाढतो, एकाग्रता वाढते. भाषा समृद्ध होते, परिणामी भाषिक विकास होण्यास मदत होते, वाचनातून आपल्याला आनंद मिळतो आणि मनोरंजनही होते.

*"Reading is to the mind*
*what*
*exercise is to the body'.*

'शरीराला व्यायाम,
तसे मेंदूला वाचन'

वाचनाने मनाची आणि मेंदूचीही मशागत होते असे म्हटले जाते. आज माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात वाचनाकडे दुर्लक्ष होत आहे. समाज माध्यमांच्या वाढत्या वापराने आपल्याला पुस्तके वाचण्यासाठी वेळ मिळत नाही. आजची युवा पिढी ही तासन्तास ऑनलाईन असते. युवकांनी व किशोरवयीन मुलांनी दररोज वाचनासाठी वेळ काढलाच पाहिजे. दिवसभरात काहीतरी चांगले वाचलेच पाहिजे. वाचन केल्याने

वैचारिक प्रगल्भता वाढते व विचारांची आधारभूत अशी बैठक तयार होते. आपल्या व्यक्तिमत्त्वाला नवा आयाम मिळतो. या गोष्टी लक्षात घेऊन वाचन संस्कृती विकसित करणे व त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

मराठी साहित्यात वाचनासाठी आत्मचरित्र, कथा, कादंबऱ्या, नाटके, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे अशा अनेक स्वरूपात साहित्य उपलब्ध आहे. त्यामुळे आपल्या आवडीनुसार आपण वाचन केले पाहिजे. या साहित्यात ज्ञानाचे भांडार आहे. अनेक मोठी माणसे वाचनातूनच घडली. वाचनातून मनावर झालेल्या संस्कारांनी त्यांच्या आयुष्याला आकार मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाचनाचा छंद होता. वाचनामुळेच त्यांचे बुद्धिवैभव आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्व प्रखर सूर्यासारखे संपूर्ण जगासमोर झळकले. त्यांच्या आयुष्यातील जास्तीत जास्त वेळ हा त्यांनी वाचनासाठी दिला. वाचनातून त्यांना प्रगाढ असे ज्ञान प्राप्त झाले, ज्याच्या बळावर त्यांनी देशासाठी, समाजासाठी अद्वितीय असे महान कार्य केले. लोकमान्य टिळक यांनी 'तुम्हांला तुमचे व्यक्तिमत्त्व घडवायचे असेल तर वाचन करा' असा संदेश दिला. धावत्या युगाबरोबर धावायचे असेल तर वाचन करा असा उपदेशही त्यांनी केला. सखोल विचारातूनच एकरूप समाज निर्माण होत असतो आणि सखोल विचार करण्याची सवय चांगल्या वाचनातूनच लागत असते.



आपल्याला जर वाचनाची आवड असेल तर मित्रमंडळी किंवा लोकांमध्ये वावरताना आपण एखाद्या विषयावरील चर्चेत आपले मुद्दे योग्य प्रकारे मांडू शकतो. त्यामुळे त्यांच्यात मिसळण्यास मदत होते. वाचनामुळे माणसाचा दृष्टिकोन व्यापक होतो आणि त्यांचे मन संकुचित, क्षुद्र, गोष्टीत, न अडकता त्यांच्या विचारांची व्यापकता वाढीस लागते. ग्रंथांना गुरू म्हटले आहे ते याच अर्थाने. मार्गारिट फुलर म्हणतात, "Today A Reader, Tomorrow A Leader.'

कोणत्याही क्षेत्रात तुम्हांला यशस्वी व्हायचे असेल तर तुम्हांला सतत त्या क्षेत्रातील नवनवीन ज्ञान व माहिती आणि कौशल्ये आत्मसात करावी लागतात. त्यासाठी वाचनाशिवाय पर्याय नाही. एक चांगले पुस्तक अनेक पिढ्यांसाठी अमूल्य अशी ज्ञानसंपत्ती असते. पुस्तक हे केवळ शब्दसंपदा वाढविण्यास मदत करणारे साधन नसून पुस्तक हे अनुभवांसह कल्पनांचे, आशा-आकांक्षाचे क्षितिज निर्माण करणारे साधन आहे. पुस्तके आपल्याला सकारात्मक विचार करायला प्रवृत्त करतात. वाचन समृद्ध असले म्हणजे लेखनाचीही प्रवृत्ती प्रबळ होते. कल्पनाशक्तीला वाव मिळतो, रसिकता वाढीस लागते आणि सर्जनशीलतेला वाट सापडते, सहृदयता व संवेदनशीलता प्राप्त होते. तसेच समाजाबाबत आपली काही कर्तव्ये आहेत याचे भान प्राप्त होते. आपल्याकडे एखाद्या कार्यक्रमाला जाताना पुष्पगुच्छ देण्याची पद्धत आहे, त्याऐवजी पुस्तके भेट देण्याची प्रथा समाजात रूढ झाली पाहिजे आणि मिळालेली पुस्तके वाचली गेली पाहिजेत. लहान मुलांना वाढदिवसाच्या निमित्ताने खेळणी, चॉकलेट किंवा इतर भेटवस्तू देण्याऐवजी पुस्तके दिली तर लहानपणापासूनच त्यांच्यावर नकळतपणे वाचनाचे संस्कार रुजविले जातील. आजच्या धावपळीच्या जगात शांत आणि समाधानी राहण्यासाठी आपण आपल्या आवडीप्रमाणे दररोज वाचन करायला हवे. वाचनाने मन प्रसन्न होते, त्याबरोबरच आत्मिक समाधान मिळते.

प्रत्येकाच्या घरात पुस्तकांचे कपाट असायलाच पाहिजे. त्या कपाटात मुलांच्या वयोगटानुसार पुस्तके असावीत. 'A room without books is like a body without a soul.'

लहान मुलांच्या मनावर संस्कार करण्यासाठी छोट्या छोट्या बोधपर गोष्टी खूप चांगला परिणाम करतात.

शाळेमध्ये वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करता येते. उदा. 'एक व्यक्ती, एक पुस्तक' भेट उपक्रमात प्रत्येक व्यक्तीने, शिक्षकांनी, माजी विद्यार्थ्यांनी व पालकांनी शाळेतील विद्यार्थ्यांना वयानुरूप अशी पुस्तके भेट द्यावीत. परिसरातील लेखक, कवींना, विद्यार्थ्यांशी संवाद करण्यासाठी आमंत्रित करणे, पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करणे, महान व्यक्तींच्या आयुष्यात वाचनामुळे घडलेले संस्कार यांविषयी माहिती देणे, विद्यार्थ्यांचे गट करून पुस्तकांवर आधारित चर्चासत्रांचे आयोजन करणे, पुस्तकांचे वाटप करून वाचन करून घेणे, 'वाचू आनंदे' या तासिकेचे आयोजन करणे, डॉ. अब्दुल कलाम यांच्या पुस्तकांवर आधारित व्याख्यानांचे आयोजन करणे इत्यादी कार्यक्रम वाचन प्रेरणा दिनी आयोजित करता येतात.

डॉ. अब्दुल कलाम म्हणत, ''पुस्तकांच्या सहवासात असताना मला ज्ञानाबरोबर नेहमीच आनंद मिळाला आहे. माझ्या घरात सुमारे ५० हजार पुस्तकांचा संग्रह आहे. आध्यात्म, विज्ञान, प्रशासन, इतिहास, भूगोल, व्यवस्थापन अशा विविध विषयांचा त्यात समावेश आहे. माझे ग्रंथ संग्रहालय ही माझी सर्वांत मोठी मौल्यवान ठेव आहे आणि तेथे व्यतीत केलेला प्रत्येक क्षण सर्वांत मौजेचा व समाधानाचा आहे.''

वाचनाचा आनंद लुटा. आपल्याला आवडणाऱ्या विषयापासून वाचनाला सुरुवात करा, सवय आपोआप लागेल. या स्पर्धेच्या युगात स्वत:ला सिद्ध करायचे असेल तर एकच मंत्र जपला पाहिजे आणि तो म्हणजे 'वाचाल तर वाचाल'.

■■■

## वाचन वसा

नंदा कुलकर्णी – भ्रमणध्वनी : ९०२८३४२७०४

*छगन हरण बघ म्हणत*
*शिकलो वाचायला.*
*कळलेच नाही केव्हा लागलो*
*पुस्तकात रमायला.*

*आजी सांगायची गोष्टी रामाच्या*
*हाती घेतले रामायण.*
*मर्यादा पुरुषोत्तम रामाच्या*
*मूल्यांचे केले पारायण.*

*परिकथांनी लावले वेड*
*सिंड्रेला ठसली मनात.*
*कळलेच नाही केव्हा आला*
*चांदोबा हातात.*

*चांदोबातल्या चित्रकथांनी*
*वेडे केले मनाला.*
*क्रांतिकारकांची चरित्रे वाचून*
*अभिमान दाटून आला.*

*इतिहासात भेटले*
*पेशवे आणि भोसले.*
*छत्रपतींच्या कथांनी*
*स्वराज्याचे वेड लावले.*

*महाविद्यालयात कळले*
*अत्रे, पुलं., सावरकर.*
*कथा, कादंबऱ्या नाटकांनी*
*मनात घट्ट केले घर.*

*तरुणाईच्या काळात*
*कवितांनीही भुरळ घातली.*
*कुसुमाग्रज, बोरकर हाती घेता*
*कल्पनेची लता बहरली.*

*वाचत वाचत समृद्ध झालो*
*आणि निश्चय केला असा*
*आपल्याही विद्यार्थ्यांना द्यायचा*
*मोलाचा हा वाचन वसा.*

# नवोपक्रमशील शिक्षक व अधिकाऱ्यांसाठी एक व्यासपीठ

**डॉ. गीतांजली बोरुडे**
वरिष्ठ अधिव्याख्याता, रा. शै. सं. व प्र. प. पुणे.
भ्रमणध्वनी : ८८८८७८१४३०

महाराष्ट्रातील सर्व शालेय विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहात आणून, त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शालेय शिक्षण प्रक्रियेतील सर्व घटक प्रयत्नशील आहेत. आपल्या विद्यार्थ्यांना शिकण्यामध्ये जर काही अडचण येत असेल, तर अशा वेळी अस्वस्थ होणारे शिक्षक यावर विचारमंथन करतात. त्यातून त्यांना काही कल्पना, क्लृप्त्या सुचतात. असे शिक्षक त्यांना सुचलेल्या नवीन कल्पना प्रत्यक्षात आणताना, नेहमीची रुळलेली वाट सोडून नवीन वाटा शोधण्याचे धाडस दाखवितात. अध्ययन–अध्यापनाचे वेगळे मार्ग आपल्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देतात. शिक्षकांप्रमाणे पर्यवेक्षकीय अधिकारी हे देखील आपल्या कार्यक्षेत्रातील शाळा व विद्यार्थी यांच्या गुणवत्ता वाढीसाठी धडपडत आहेत. आपल्या नेहमीच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात नावीन्य आणण्याचा ते सातत्याने प्रयत्न करीत असतातच. एकूणच शालेय शिक्षणातील सर्व स्तरांवरील उपक्रमशील शिक्षक व अधिकारी हे त्यांच्या दैनंदिन कामकाजात नावीन्य आणून त्यातील नवचेतना टिकवून ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे तुम्ही देखील पाहिले असेल.

> *प्रत्येक शाळेत काही ना काही नवीन उपक्रम राबविले जातात. शिक्षक व पर्यवेक्षीय अधिकारी यांचे हे नवोपक्रम त्यांचे विद्यार्थी, शाळा किंवा त्यांच्या कार्यक्षेत्रांपुरतेच मर्यादित राहतात. ते सर्वांपर्यंत पाहोचले तर अन्य शिक्षकांना ते आपल्या विद्यार्थ्यांसाठी उपयोगात आणता येऊ शकतात. नवोपक्रमशील शिक्षक, मुख्याध्यापक तसेच क्षेत्रीय यंत्रणेतील सर्व अधिकारी यांना त्यांचे नवोपक्रम सादर करण्यासाठी एक व्यासपीठ मिळावे याकरिता दरवर्षी राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा आयोजित करण्यात येते. ही स्पर्धा, स्पर्धेचा निकाल व अहवाल लेखन कार्यशाळा याविषयी...*

नवोपक्रमशील शिक्षक वा अधिकारी हे प्रत्येक वेळी समस्या निर्माण होण्याची वाट न पाहता, प्रत्येक बाबीमध्ये नावीन्य आणून, त्या प्रत्येक गोष्टीला सुलभ, आकर्षक आणि अधिक आनंददायी करण्याचा सदैव प्रयत्न करीत असतात. सध्याच्या या माहिती तंत्रज्ञान युगात तंत्रज्ञानाच्या मदतीने नवोपक्रमशील शिक्षकांनी अध्ययन–अध्यापन प्रक्रिया सुलभ तर केली आहेच, त्यासोबत ती अधिक मनोरंजक देखील केली आहे. शिक्षकांबरोबरच क्षेत्रीय अधिकारी हे देखील त्यांच्या कार्यक्षेत्रांतील शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी कटिबद्ध झालेले आहेत. तेही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांच्या मदतीने नवनवीन प्रयोग करीत आहेत. हे प्रयोग शालेय विषयांबरोबरच विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनाशी देखील निगडित आहेत. शिक्षण क्षेत्रातील हे सर्व नावीन्यपूर्ण प्रयत्न म्हणजे नवोपक्रमच आहेत.

आज राज्यातील प्रत्येक शाळेत काही ना काही नवीन उपक्रम राबविले जात आहेत परंतु बऱ्याचदा उपक्रमशील शिक्षक व पर्यवेक्षीय अधिकारी यांचे हे नवोपक्रम त्यांचे विद्यार्थी, शाळा किंवा त्यांच्या कार्यक्षेत्रांपुरतेच मर्यादित राहतात. तेच वैविध्यपूर्ण

नवोपक्रम सर्वांपर्यंत पोहोचले तर राज्यातील इतर शिक्षक व अधिकारी यांना ते आपल्या विद्यार्थ्यांसाठी उपयोगात आणता येऊ शकतात. म्हणूनच राज्यातील पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील हे धडपडणारे नवोपक्रमशील शिक्षक, मुख्याध्यापक तसेच क्षेत्रीय यंत्रणेतील सर्व अधिकारी यांना त्यांचे नवोपक्रम सादर करण्यासाठी एक व्यासपीठ मिळावे याकरिता राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यामार्फत दरवर्षी राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा आयोजित करण्यात येते. सन २०१७-१८ पासून सदर स्पर्धा ही शिक्षकांसोबत पर्यवेक्षीय यंत्रणेसाठी देखील राबविण्यात येत आहे. सन २०१८-१९ पासून म्हणजे समग्र शिक्षा लागू झाल्यापासून राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत पूर्व प्राथमिक गटाचा देखील समावेश करण्यात आला आहे. अशा रीतीने मागील दोन वर्षांपासून सदर स्पर्धा एकूण पाच गटांत ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्र स्तरावरून वेब पोर्टल निर्मिती देखील करण्यात आली आहे. एकूणच राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा घेण्याच्या पद्धतीमध्ये देखील नावीन्य आणण्याचा प्रयत्न केला आहे. राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०१९-२० चे नावीन्य म्हणजे राज्य स्तरावरील प्रत्येक गटाची सादरीकरण संदर्भातील दुसरी फेरी, कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊनच्या काळात ZOOM Cloud meeting च्या माध्यमातून घेण्यात आली.

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेचा निकाल तुम्ही सर्वांनी http://innovation.scertmaha.ac.in या लिंकवर पहिलाच असेल; तरीही आपणा सर्वांना त्यांचे नवोपक्रम पाहता यावे, वाचता यावे आणि स्वत:च्या शाळेत अथवा कार्यक्षेत्रात त्याचा वापर करता यावा, यासाठी या ठिकाणी आपणास सन २०१९-२० मधील राज्य स्तरावरील उत्कृष्ट नवोपक्रम गटनिहाय उपलब्ध करून देत आहे. सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून आपण आपल्याला हव्या त्या गटातील नवोपक्रम पाहू शकाल.

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०१९-२० मधील गटनिहाय नवोपक्रम पाहण्यासाठी पुढील QR कोड स्कॅन करा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गट १ : पूर्व प्राथमिक अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका | गट २ : प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापक | गट ३ : माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व मुख्याध्यापक | गट ४ : विषय सहायक व विषय साधनव्यक्ती | गट ५ : अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकीय अधिकारी |

तुम्ही तुम्हांला हव्या असलेल्या कोणत्याही गटातील नवोपक्रम अहवाल QR कोडच्या मदतीने स्कॅन करून पाहिले असतीलच. या ठिकाणी आपणा सर्वांना एक सूचित करावेसे वाटते की, वरील नवोपक्रम हे जरी उत्कृष्ट असतील, तरीही त्यांच्या अहवाल लेखनात काही त्रुटी असू शकतात. परंतु यापुढे नवोपक्रम अहवाल लेखनातील त्रुटी कमी व्हावात यासाठी राज्यस्तरावरून online स्वरूपात नवोपक्रम अहवाल लेखनासंदर्भात एक कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. तरी इच्छुक शिक्षकांनी https://tinyurl.com/innovtion2020-21 लिंकवर सदर कार्यशाळेतील सहभागासाठी नोंदणी करावी.

तसेच राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२०-२१ साठी नवोपक्रम प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. स्पर्धेसाठी इच्छुक शिक्षक व अधिकारी यांनी http://innovation.scertmaha.ac.in या लिंकवर दि. १५ ऑक्टोबर २०२० नंतर online स्वरूपात प्रस्ताव सादर करावेत. सदर लिंक एक महिन्याच्या कालावधीसाठी खुली राहील. सर्व स्तरांवरील नवोपक्रमशील शिक्षक व अधिकारी यांनी या स्पर्धेत सहभागी होऊन आपला नवोपक्रम इतरांच्या माहितीसाठी उपलब्ध करावा.



२८ ऑक्टोबर : सरदार यशवंतराव होळकर स्मृतिदिन (१८११)

# वेळ व प्राथमिकता व्यवस्थापन

**राजीव नंदकर**
उपजिल्हाधिकारी, मुंबई
भ्रमणध्वनी : ९९७०२४६४१७

शिक्षण आणि शिक्षणेतर क्षेत्रांत काम करीत असताना, विविध कामे पूर्ण करण्यासाठी माझ्याकडे वेळच शिल्लक राहत नाही ! हे वाक्य आपण दैनंदिन व्यवहारामध्ये आपल्या अनेक शिक्षक मित्रांकडून नेहमी ऐकतो. बदलत्या युगाला साद देणारे आधुनिकीकरण आणि पाश्चात्त्यीकरण हे शब्द आता कालबाह्य होत असून सोशल मीडिया, कोडिंग व डीकोडिंग, ऑनलाईन मीटिंग, ॲप्लिकेशन, चॅटिंग हे शब्द आता प्रत्येक व्यक्तीच्या दैनंदिन व्यवहाराचा भाग झाले आहेत. पेपरमध्ये येणाऱ्या बातम्या, इलेक्ट्रॉनिक्स मीडियामध्ये येणाऱ्या बातम्या, सोशल मीडियावर येणारी माहिती, विविध पोस्ट, डिजिटल पोस्टर, व्हिडिओ, आपण ठरविलेली कामे, साहेबांनी सोपविलेली कामे, कौटुंबिक व सामाजिक जबाबदाऱ्या या सर्व कामांच्या ओझ्याखाली आपण इतके दबून गेलो आहोत की, यांचे दूरगामी असे परिणाम आपल्या शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्यावर होत आहेत. त्यामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, चिंता वाटणे, भीती वाटणे, चिडचिड होणे, तणाव वाढणे आणि औदासीन्य व खिन्नता येणे यांसारखे अनेक गंभीर आजार व विकार यांनी आपल्याला घेरले आहे. यातून जर बाहेर पडायचे असेल, तर आपल्या दैनंदिन जीवनात वेळ व प्राथमिकता व्यवस्थापन योजना आपण अंगीकारली पाहिजे. आपल्याकडे उपलब्ध असलेला वेळ, आपली प्राथमिकता आणि आपल्याला करावयाची खूप कामे यांचे गणित सोडविण्याचे कौशल्य कसे हस्तगत करावे या बाबतचे विचारमंथन आपण या लेखात करणार आहोत.

> *'Time is money' हे वचन आपल्याला माहीत असतं, पण वेळेचे नियोजन करता येत नाही अशीच बहुतेकांची अवस्था असते. साहजिकच कामे पार पाडण्यात कायमच गोंधळ होतो. महत्त्वाची कामे राहून जातात. नेमके चुकते कुठे? काय करायला हवे? कसे करायला हवे? या विषयी अचूक मार्गदर्शन करणाऱ्या या लेखात वाचा वेळ व प्राथमिकता व्यवस्थापन याविषयी...*

वेळ ही संज्ञा अस्तित्वात असलेल्या व वास्तवात घडलेल्या घटनांची नोंद व परिगणना करण्यासाठी वापरली जाते. साहजिकच वेळ अजून खोलवर समजून घ्यायची झाल्यास काळ पुढे सरकत असतो व घटना मागे पडत राहतात. अजून विस्ताराने सांगायचे झाल्यास हृदयाचा प्रत्येक ठोका हा एक सेकंदामध्ये भूतकाळ होत असतो. त्या अनुषंगाने जोपर्यंत आपण आपल्याकडे उपलब्ध असलेला वेळ व आपली ध्येये (goal) गाठण्यासाठी लागणारी विविध लक्ष्ये (targets) याची प्राथमिकता ठरवून मेळ घालणार नाही, तोपर्यंत कार्यालयीन परिणामकारकता गाठू शकणार नाही.

वेळ अथवा काळ अनमोल आहे व तो ऊर्जेचा मुख्य स्रोत म्हणजे सूर्य याच्याशी निगडित आहे. सूर्य ऊर्जा निर्माण करतो. ही ऊर्जा ग्रहण करून वनस्पती अन्न निर्माण करतात. आपण हे अन्न म्हणून सेवन करून स्वत:मध्ये ऊर्जा निर्माण करतो. मात्र ही ऊर्जा आपण उपलब्ध वेळेशी समन्वय साधून कशी खर्च करतो, यावर आपल्या कार्याचे अथवा कामकाजाचे यश अवलंबून असते. त्यामुळे सूर्य-ऊर्जा-व्यक्ती-वेळ हा कार्यकारण भाव समजून घेणे आवश्यक आहे. त्यानुरूप आपल्याकडून निर्माण होणारी क्रयशक्ती आणि कार्यशक्तीच्या आधारे निर्माण होणारे कार्य आपल्यासाठी तर महत्त्वाचे आहेच, त्या सोबत ते विद्यार्थी, समाज व राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचे आहे.

वेळेचे व्यवस्थापन म्हणजे आपल्याकडे उपलब्ध असलेल्या वेळचा योग्य वापर व त्याचे योग्य व्यवस्थापन करून कामांची परिणामकारकता वाढविणे होय. वेळेचे योग्य नियोजन व व्यवस्थापन साधले की, आपण तणावमुक्त होतो. आपली कार्यक्षमता वाढते. प्राथमिकता निश्चित करता येते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्याला समाधान लाभते. आपले लक्ष्य व ध्येय वेळेवर किंवा वेळेपूर्वी गाठता येते. आपल्या कामाची उत्पादकता वाढते. आपला आत्मविश्वास वाढतो. जीवनाचा व जगण्याचा समतोल साधला जातो. आपण आपल्या आयुष्याबाबत अधिक समाधानी व सकारात्मक होतो. वेळेचे व्यवस्थापन करीत असतानाही आपल्याला कामांची प्राथमिकता निश्चित करता येणे आवश्यक आहे, यासाठी आपण खालील ११ सूत्रांचा अंगीकार करावा.

१) नोंदवही : (डायरी) आपल्यासमोर असलेली कामे बहुतांशी आपण आपल्या मेंदूमध्ये ठेवतो आणि जशी ती आठवतील त्याप्रमाणे ती करत जातो. तसेच अचानक उद्‌भवणारी कामे तर आपल्या समोर असतातच. यासाठी आपण आपल्या कामाची एक नोंदवही अथवा डायरी तयार करणे व त्या डायरीत ही कामे लिहून ठेवणे आवश्यक ठरते, त्यामुळे प्रत्येक वेळेस काम आठवण्यासाठी मेंदूवर ताण देण्याची गरज नाही. शैक्षणिक, गैरशैक्षणिक कामे, खाजगी व वैयक्तिक स्वरूपाची कामे अशा नोंदी घ्याव्यात.

२) TWM सूत्र : आपल्या नोंदवहीत अथवा डायरीमध्ये ही कामे लिहून ठेवीत असताना त्या कामांचे तीन प्रकारे वर्गीकरण करावे. त्या वर्गीकरणास TWM म्हणायचे आहे. T (Today's Work) म्हणजे आजची कामे, W (Weekly Works) म्हणजे आठवड्याची कामे, M (Monthly Works) म्हणजे महिन्यात पूर्ण करायची कामे. अशी वर्गवारी केल्याने आपल्या कामाची तीन टप्प्यांत प्राथमिकता निश्चित होते.

३) ABCD प्राथमिकता : TWM कामाचे आपल्याला परत ABCD असे प्राथमिकतेनुसार वर्गीकरण करायचे आहे. A म्हणजे महत्त्वाची व अत्यावश्यक अशी कामे, B म्हणजे महत्त्वाची, पण अत्यावश्यक नाहीत अशी कामे, C म्हणजे अत्यावश्यक पण महत्त्वाची नाहीत अशी कामे आणि D म्हणजे अत्यावश्यक नाहीत व महत्त्वाचीही नाहीत अशी कामे. असे वर्गीकरण झाले की, आपल्याला कामाची प्राथमिकता ठरविणे व त्यातून कमी वेळात जास्तीत जास्त कामे पूर्ण करणे शक्य होते.

४) मिनी डायरी अथवा मोबाईल नोट : आपल्याला नवीन कामे किंवा नवीन कल्पना कोठे व कधीही सुचू शकतात आणि त्या जेव्हा सुचतात त्याच वेळी

त्याची नोंद घेणे आवश्यक ठरते, अन्यथा त्या आपण विसरून जातो. हे टाळण्यासाठी एक लहान डायरी आपण आपल्या खिशात ठेवू शकतो किंवा आताच्या या मोबाईलच्या युगात मोबाईल मध्ये नोट सेव्ह करू शकतो. त्या नंतर अशी नोंदविलेली कामे वर्गीकरणासह मुख्य डायरीमध्ये नोंदवावीत.

५) अनावश्यक गोष्टी : आपले पाकीट, तुमची फाइल, आपले ड्रॉवर, आपले टेबल, आपला वर्ग, तुसेच आपल्या रूममधील प्रत्येक वस्तू ही दर आठवड्यात एकदा तपासणे आवश्यक आहे. अनावश्यक गोष्टी त्यातून कमी करणे ही सुद्धा वेळ व्यवस्थापनाची गुरुकिल्ली आहे.

६) कामाची विभागणी : आपल्यासमोर असलेली कामे आपण TWM व ABCD यात वर्गीकरण करून घेतली पाहिजेत. तसेच यांतील जास्त वेळ घेणारी कामे ही काही तुकड्यांमध्ये आपण विभागू शकतो किंवा ही कामे पूर्ण करताना आपण लहान पाऊल (baby step) उचलून पूर्ण करू शकतो.

७) कामाची माहिती : एखादे काम सुरू करीत असताना प्रथम ते काम आपला किती वेळ घेणार आहे हे लक्षात घेऊन कामास सुरुवात करा. जर आपल्याला हे माहीत नसेल की, त्या कामाला किती वेळ लागणार आहे आणि आपण काम सुरू केले तर ते आपल्याला अर्धवट सोडावे लागू शकते आणि त्यामुळे आपला तर वेळ जातोच परंतु आपली नाउमेद होऊन चिडचिड होते व संपूर्ण वातावरण खराब होते.

८) कामांची चालढकल : कामांची चालढकल करणे हा खूप मोठा दुर्गुण आपल्यात असतो. हे आपल्याकडून कधी अजाणतेपणाने तर कधी जाणीवपूर्वक होते परंतु हे आपण लक्षात ठेवावे की, आपली कामे ही शेवटी आपल्यालाच करावी लागतात. त्यामुळे केलेल्या नियोजनात साधारण ५ टक्के तफावत आपण ठेवू शकतो.

९) कामाचे वेळ मूल्यमापन : काम झाले की, आपण त्या कामाचे कधीही मूल्यमापन करीत नाही. वास्तविक मूल्यमापन करीत राहिल्याने आपल्याला आपल्या कार्यपद्धतीमध्ये आणखी सुधारणा करणे शक्य होते. त्यामुळे आपली परिणामकता व कार्यक्षमता यांमध्ये भरीव वाढ होते.

१०) ऊर्जा चक्र व आपली क्षमता : आपल्या शरीराचे व मनाचे एक ऊर्जा चक्र असते. ही ऊर्जा दिवसामध्ये कमी–जास्त प्रमाणात आपल्याला उपलब्ध होत असते. त्या अनुषंगाने आपण आपली ऊर्जा व आपली क्षमता विचारात घेऊन कामे पूर्ण केली पाहिजेत..

११) स्वतःसाठी वेळ : विश्रांती व झोप या आपल्यासाठी खूप आवश्यक बाबी आहेत. व्यायाम, प्राणायाम, योगा व ध्यानधारणा यांमुळे आपल्या शरीराचा आणि मनाचा समतोलपणा राखला जातो. मनोरंजन, छंद व कुटुंब–मित्र–आप्तेष्ट यांच्यासाठी आपण जाणीवपूर्वक वेळ काढणे महत्त्वाचे व तेवढेच अत्यावश्यक आहे. आपण आपल्या स्वत:साठी वेळेचे व्यवस्थापन करायला सुरुवात केली की, आपल्या इतर कामांतही ती शिस्त येते.

आपण वेळ व प्राथमिकता व्यवस्थापन या बाबत आपली स्वत:ची वेळ व्यवस्थापन योजना बनवून आपली कार्यक्षमता वाढवू शकतो, तसेच यामुळे आपण तणावमुक्त होऊन सकारात्मक व उत्साही होतो.

■■■

सप्टेंबर २०२० चा 'जीवन शिक्षण' अंक वाचला. लॉकडाऊन काळात शाळा बंद असूनही सर्व शिक्षकांना कृतिशील ठेवण्याचे व प्रेरणा देण्याचे काम 'जीवन शिक्षण' मासिक करीत आहे. शिक्षक दिनानिमित्त प्रसिद्ध झालेल्या सप्टेंबरच्या 'जीवन शिक्षण' अंकाचे 'मडके घडविणाऱ्या कुंभाराचे हात' हे मुखपृष्ठ भावी पिढीला घडविणाऱ्या शिक्षकांना समर्पित केले आहे. 'खरा शिक्षक तो, जो विद्यार्थ्यांच्या डोळ्यात भविष्याची दिशा पेरतो' हे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे वाक्य मनाला स्पर्श करते. भारताचे भवितव्य असणाऱ्या भावी पिढीच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे, यावर या अंकात प्रकाश टाकलेला आहे हे प्रकर्षाने जाणवले. 'जीवन शिक्षण' मासिकाचे संपादक दिनकर पाटील यांच्या 'संपादकीय' मध्ये सांगितलेली खऱ्या गुरूची दोन गुणवैशिष्ट्ये शिक्षकांनी आत्मसात करणे गरजेचे आहे असे वाटते. नवीन तंत्रज्ञान आत्म सात करून त्याचा गुणवत्तावाढीसाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कसा उपयोग करून घेता येईल याचा ध्यास शिक्षकांनी नक्कीच घ्यायला हवा, हे विचार प्रेरणादायी आहेत. शिक्षक दिनानिमित्त सर्वांचे शुभेच्छा संदेश वाचून आनंद झाला.

लॉकडाऊन काळात ऑनलाईन शिक्षणाबद्दलचे उपक्रम, कोरोनाच्या संकट काळातील ऑनलाईन शिक्षणाच्या विविध संधी, शाळा बंद तरी शिक्षण सुरू रहावे यासाठी तंत्रज्ञानाची साधने वापरून विद्यार्थ्यांना स्वयं-अध्ययन करण्याबाबत मार्गदर्शन मिळाले. डॉ. मंजूषा क्षीरसागर यांनी उपक्रमशील शाळा व शिक्षक यांच्याशी संवाद साधून तयार केलेली नऊ पुस्तके प्रेरणादायी आहेत. राज्य विज्ञान शिक्षण संस्था तथा प्रादेशिक विद्या प्राधिकरण, नागपूर या संस्थेने सुरू केलेला 'सायन्स लर्न फ्रॉम होम' हा उपक्रम प्रशंसनीय आहे. 'सांगा सांगा बाई सांगाना, कोरोना जाईल का?' ही विद्याधर शुक्ल यांची कविता सद्य:परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या आंतरिक मनात चाललेली खळबळ सांगून जाते. 'केल्याने होत आहे रे' या वैभव जगताप यांच्या लेखात ऑनलाईन शिक्षणाचा प्रवास कसा सुरू झाला याविषयी छान माहिती मिळाली.

मलपृष्ठावर सायन्स ॲक्टिव्हिटी सेंटर, आयसर पुणे, यांच्या रंगीत चित्रे व प्रत्यक्ष प्रयोगातून विज्ञान व गणिताचे मजेदार शिक्षण मिळाले व हा प्रयोग माझ्या वर्गाच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर टाकला असता विद्यार्थी आवर्जून घरी प्रयोग करून पाहू लागले.

एकंदरीत 'जीवन शिक्षण' मासिकातील सर्वच लेख विद्यार्थी व शिक्षकांना मोलाचे मार्गदर्शन करणारे व प्रेरणा देणारे आहेत. त्याबद्दल 'जीवन शिक्षण' संपादक मंडळाला मन:पूर्वक धन्यवाद. 'जीवन शिक्षण'कडून उपयुक्त माहितीचा खजिना आणि मार्गदर्शन असेच यापुढेही मिळत राहो.

**शीतल झरेकर**

जि. प. प्राथ. शाळा प्रवरासंगम, ता. नेवासा, जि. अहमदनगर



३० ऑक्टोबर : संयुक्त राष्ट्रसंघाचे भारताला सदस्यत्व (१९४५)




# प्रत्यक्ष प्रयोगातून विज्ञान व गणिताचे मजेदार शिक्षण

## तापमान आणि विद्युत विरोध यांचा संबंध


### आवरणरहित बल्बने कमीजास्त होणारा प्रकाश

(Open Bulb Experiment)








साहित्य : टंगस्टनचा बल्ब व होल्डर, छोटा बल्ब व होल्डर, जोडतारा, दोन ९ व्होल्टच्या बॅटरी.





टंगस्टन बल्बचे काचेचे आवरण अगदी काळजीपूर्वक काढून फिलामेंट (आतील तारेचे वेटोळे) व्यवस्थित काढून घ्या.




आकृतीत दाखविल्याप्रमाणे दोन ९ व्होल्टच्या बॅटरी जोडतारा वापरून एकसर जोडणीमध्ये जोडून घ्या.





बॅटरीच्या ऋण टोकाला टंगस्टन फिलामेंट होल्डर तर धन टोकाला छोटा बल्ब एकसर जोडणीमध्ये जोडून घ्या.





ज्यावेळी विद्युत परिपथ पूर्ण होते, तेव्हा छोटा बल्ब प्रकाशमान होतो.




आता फिलामेंटवर हळुवारपणे फुंकर मारा. फुंकर मारली असता फिलामेंट थंड होते आणि छोटा बल्ब जास्त प्रकाशमान झालेला दिसतो.




फिलामेंटला काडेपेटीतील काडीच्या साहाय्याने उष्णता द्या. आता छोट्या बल्बची प्रकाशमानता कमी झालेली दिसते.




आम्हाला आशा आहे की, हा प्रयोग आपणाला नक्कीच आवडला असेल, असे प्रयोग करताना तुम्हाला सुद्धा मजा येईल. असेच मजेदार प्रयोग करून हसत खेळत शिका.

**वैज्ञानिक कारण :** काडेपेटी किंवा लायटरने जेव्हा आपण टंगस्टन तारेच्या वेटोळ्याचे तापमान वाढवितो तेव्हा त्यातून वाहणाऱ्या विद्युत धारेला विरोध वाढत जातो व याच्या उलट तारेच्या वेटोळ्याचे तापमान कमी केल्याने (फुंकर मारून टंगस्टन फिलामेंट थंड केल्याने) त्यातून वाहणाऱ्या विद्युत धारेला विरोध कमी होत जातो. याच कारणामुळे फुंकर मारली असता टंगस्टन फिलामेंट मधून वाहणाऱ्या विद्युत धारेला विरोध कमी झाल्याने परिपथातून विद्युत प्रवाह वाढत जाऊन छोटा बल्ब जास्त प्रकाशमान होतो आणि याच उलट टंगस्टन फिलामेंटला उष्णता दिल्याने परिपथातून वाहणारा विद्युत प्रवाह कमी होत जाऊन छोटा बल्ब कमी प्रकाशमान होतो.

निर्मिती : **सायन्स ॲक्टिव्हिटी सेंटर, आयसर, पुणे.**

'जीवन शिक्षण' हे मासिक मालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्यासाठी मुद्रक व प्रकाशक श्री. दिनकर पाटील यांनी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगाव बु.।।, सिंहगड रोड, पुणे-४१ येथे छापून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले.

Date of Publication 3 October 2020
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th of October 2020
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

'Registered'

Reg. No. RNI - 14563/57
Post Registration No.: PCW/063/2018-2020
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**

## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
## जीवन शिक्षण प्रकाशन विभाग




पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०-२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

प्रति ____________________
____________________
____________________
____________________